TEXT FLY WITHIN
THE BOOK ONLY

UNIVERSAL
LIBRARY

OU_194650

UNIVERSAL
LIBRARY

जीवनयोग

(अेक भाव-काव्य-कथा)

कवि

ना. ग. जोशी, अेम्. अे.

★

सन्ध्या प्रकाशन : २]   [मूल्य १० आणे

प्रकाशक :
माधव राजाराम देशपांडे
'सन्ध्या प्रकाशन', १२ टिळक रोड, पुणें २

प्रथम संस्करण : जानेवारी १९४२
सर्व हक्क लेखकाचे आधीन

मुद्रक :
श्रीपाद रघुनाथ राजगुरु
'राजगुरु प्रेस', ४०५ नारायण, पुणें २

प्रस्तावना

१

'जीवनयोग' या तत्त्वज्ञानपर खंडकाव्याचे लेखक श्री. ना. ग. जोशी हे मूळचे कोकणांतले. रत्नागिरी जिल्ह्यांतील दापोली तालुक्यांत आंजर्ले म्हणून एक प्रसिद्ध गांव आहे. तेथें आपल्या आजोळीं ता. ४ ऑक्टोबर १९११ रोजीं त्यांचा जन्म झाला. त्यांचे वडील महाडला खाजगी नोकरींत असल्यामुळें प्रवेश-परीक्षेपर्यंतचें त्यांचें सर्व शिक्षण महाड येथें झालें. भावनगरच्या सामळदास कॉलेजांत संस्कृत आणि इंग्रेजी हे विषय घेऊन ते बी. ए. झाले. या वेळीं इंग्रेजींत त्यांनीं 'ऑनर्स' संपादिले. पुढें इंग्रेजी मुख्य आणि संस्कृत गौण असे विषय घेऊन त्यांनीं तेथूनच एम्. ए.ची पदवी मिळविली. अलीकडे ते कांहीं वर्षें अहमदाबाद् येथील 'भारती विद्यालयां'त अध्यापक म्हणून काम करीत आहेत. त्यांच्या प्रारंभीच्या कांहीं स्फुट कविता 'केसरीं'त प्रसिद्ध झाल्या असून 'सह्याद्रीं'त कांहीं सुनीतें व पत्रव्यवहार प्रसिद्ध झाला आहे. तथापि 'लोकशिक्षण' आणि 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' यांमधून कविता, ग्रंथपरीक्षणें आणि कित्येक साहित्यविषयक मूल्यवान् लेख असें त्यांचें विशेष महत्त्वाचें लिखाण प्रसिद्ध झालें आहे. गुजरातेंत राहिल्यानंतर त्यांनीं गुज़राती भाषेचा आणि वाङ्मयाचा अभ्यास केला. तेथील प्रतिष्ठित मासिकांतून गुजराती भाषेंत ते मधुनमधून लेखहि लिहीत असतात. प्रस्तुत खंडकाव्याचा शेवटचा विभाग 'महाराष्ट्र साहित्य पत्रिके'च्या जुलै १९४१ च्या अंकांत पूर्वींच प्रकटलेला आहे. आज ही कृति समग्ररूपानें स्वतंत्रपणें वाचकांच्या हातीं पडत आहे.

'जीवनयोग' हें काव्य गेल्या दहा वर्षांत निरनिराळ्या अवस्थांतून गेलें आहे. या दीर्घ कालांत कवीच्या जीवनांत आणि विचारांत जो विकास होत गेला तो या काव्यांत वेळोवेळीं प्रतिबिंबित झालेला

आढळतो. प्रेम आणि स्वातंत्र्य या तरुण मनाच्या प्रधान महत्त्वाकांक्षा असतात. यामुळें या काव्याचा प्रारंभ रमणी-प्रेम आणि राष्ट्र-स्वातंत्र्य या यौवनाच्या प्राथमिक पुरुषार्थांत झाला आहे हें स्वाभाविकच आहे. तथापि येथेंहि धगधगीत ध्येयवाद आणि भावनेची उत्कटता या गोष्टी आहेतच. विजिगीषा (विजयाची इच्छा) ही यौवनाची दुर्दम आकांक्षा असते. या आकांक्षेमुळेंच यौवनांत असंख्य पराक्रमाचीं कृत्यें घडून येतात. प्रेमाला पराक्रमाची साथ असेल तर तें जीवन-विकासाला साह्य करितें आणि व्यक्तीला भोगविलासाच्या भोंवऱ्यांतून बाहेर काढून ध्येयसाधनेच्या अनंत यात्रेला प्रेरित करितें. सर्वकाळच्या साहित्यांत शृंगाराशीं वीररसाचें साहचर्य वर्णिलेलें आढळतें त्यांतील आशय हाच आहे. एकटा शृंगार जीवनाचा विकास करण्याला सर्वतः असमर्थ आहे. वीर-कर्माला प्रेरणा आणि प्रोत्साहन देण्याचे कामीं उपयोगी पडणारा शृंगार हाच जीवनांत ग्राह्य धरलेला आहे. म्हणून यौवनाच्या प्रारंभीं जीवनाला व्यापून टाकणारा शृंगार यौवनांतील वीरवृत्ति जागृत करून कृतार्थ होतो. शृंगाराचें जीवनांतील हें स्थान नीट ध्यानीं आणिलें पाहिजे.. म्हणजे शृंगाराची भीति वाटणार नाहीं अथवा त्याचें अवास्तव स्तोम माजविण्याकडेहि प्रवृत्ति होणार नाहीं. 'जीवनयोगां'त शृंगाराचें यथार्थ स्वरूप चित्रिलें असल्यामुळें तो परिणामकारक झाला आहे. कवीच्या सुसंस्कृत अभिरुचीचें स्पष्ट दर्शन येथेंच होतें. यौवनाचा स्थायी भाव उत्साह हाच असतो. अनेक विपरीत कारणांनीं या उत्साहाच्या विविध विकृती प्रत्यक्ष जीवनांत आढळून येतात हा कांहीं यौवनाचा दोष नाहीं. समाजाला आपलें यौवन अविकृत राखण्याची विद्या संपादन केली पाहिजे. साहित्यानें ही जीवन-विद्या समाजाला पुरवावयाची असते. 'जीवन-योगां'त रमणी-प्रेमाचा राष्ट्र-स्वातंत्र्याशीं संबंध जोडून दिल्यामुळें यौवनाची उत्साहवृत्ति प्रफुल्लित करण्याची शक्ति त्यांत स्वभावतःच निर्माण झाली आहे. 'संदेश', 'मंत्रणा',

'बंदिवास' आणि 'दर्शन' या चार विभागांचा मिळून एक खंड होतो. या खंडांत रमणी-प्रेम आणि राष्ट्र-स्वातंत्र्य यांचें मनोहर मीलन आढळतें. शृंगार आणि वीर या दोन रसांची यांत अभिव्यक्ति झाली असून तात्त्विक दृष्टीनेंहि जीवनाचें एक रमणीय ध्येयदर्शन उमटलें आहे. येथेंच कवीला थांबतां आलें असतें, आणि रसिकांनींहि त्याबद्दल तक्रार केली नसती. कर्तव्याची प्रेरणा दिल्यानें प्रेम कृतार्थ झालें असतें, आणि राष्ट्रोद्धारार्थ जीवन वेंचण्याचा संकल्प दृढावल्यानें वीरवृत्तीचीहि सांगता झाली असती. पण राष्ट्रीय स्वातंत्र्याचें ध्येयहि आतां अपुरें झालें आहे. इतकेंच नव्हे, तर राष्ट्रवादाची साम्राज्य-वादांत आणि साम्राज्यवादाची सर्वसंहारक शस्त्रवादांत भयानक विकृति झाली आहे. यामुळें राष्ट्र-प्रेमाच्या भोंगळ कल्पना आणि शस्त्रसंग्रामाच्या मोहक वल्गना जगांतील बुद्धिमंतांना हास्यास्पद वाटूं लागल्या आहेत. 'जीवनयोगा'चे लेखक हे एक विकसनशील साहित्यिक आहेत. त्यांची प्रतिभा जितकी तेजस्वी आहे तितकीच त्यांची प्रज्ञाहि देदीप्यमान् आहे. त्यांच्या प्रज्ञेनें गेल्या दहा वर्षांत जो नवीन प्रकाश मिळविला त्यानें त्यांची प्रतिभाहि उजळून गेली. आणि त्या प्रतिभेनें राष्ट्रवादाच्या संकुचित मर्यादेचा भेद करून विश्वाच्या जीवनयोगाचें दर्शन घेतलें. विश्वाच्या या जीवनयोगांतच विविध राष्ट्रांचें आणि त्या राष्ट्रांतील विविध जनसमूहांचें कल्याण करण्याची शक्ति समावलेली आहे. या नवदर्शनामुळेंच या खंडकाव्याला शेवटचा विभाग मिळाला; आणि आधींच रमणीय असलेल्या या काव्याला व्यापक जीवनसत्याची प्रतिष्ठा लाभल्यामुळें त्याला भव्यता आणि उदात्तता यांची जोड प्राप्त झाली. कवीच्या विकासाबरोबर काव्याचा विकास झाला असें मीं वर म्हटलें त्याचा अर्थ आतां रसिकांच्या सहज ध्यानीं येईल.

ध्येयवादाच्या बुडाशीं सहानुभूतीची व्यापक वृत्ति असेल तर जीवना-च्या वाढत्या अनुभवांत ध्येयवादाचें स्वरूपहि व्यापक आणि विशुद्ध

होत जातें. 'जीवनयोगा'ची प्रारंभीची बैठक अशाच व्यापक सहानुभूतीची आहे. केवळ व्यक्तिनिष्ठ अथवा सुखवादी वृत्तीचा येथें अभाव आहे. 'विजय' वीरवृत्तीचा तरुण असल्यामुळें त्याचे अंगीं कठोर कर्तव्यनिष्ठा बाणलेली आहे. 'शांता'देखील सुखलोलुप वृत्तीची कल्पिलेली नाहीं. कर्तव्याच्या काटेरी मार्गावर पावलें टाकण्याची हिंमत तिच्या प्रेमांत आहे. यामुळें त्या दोघांच्याहि जीवनाला आरंभापासूनच करुण-गंभीर वळण लागलेलें आहे; आणि म्हणूनच शेवटीं या काव्यांतील ध्येयवादाला व्यापक स्वरूप लाभलें. 'जीवनयोगां'तील मुख्य रस शृंगार किंवा वीर हा नसून गंभीर आणि उदात्त असा करुणरसच आहे. करुणरस म्हटला म्हणजे 'कळवळून रडणें' अशी सर्वसामान्य समजूत आहे. आणि रोजच्या अनुभवाकडे पाहिलें म्हणजे जीवन हा अश्रूंचा एक महासागरच आहे हें कोणालाहि पटण्यासारखें आहे. पण

'एको रसः करुण एव'

असें भवभूतीनें म्हटलें तें कांहीं या अश्रूंच्या महासागराला उद्देशून नव्हे. अश्रू ही दुर्बलतेची कबुली आहे. आणि समाज सामान्यतः दुर्बलांचाच असल्यामुळें बहुसंख्य लोकांचें वास्तविक जीवन निष्फलतेच्या निःश्वासांनींच कोंदाटलेलें असलें तर त्यांत आश्चर्य नाहीं. पण महाकवी ज्या महापुरुषांचें चित्र रेखाटतात ते महापुरुष सामान्य लोकांप्रमाणें दुर्बल आणि रडवे असत नाहींत. त्यांच्या हृदयांत कोठें तरी अनंताची हांक त्यांना ऐकूं येत असते. त्या हांकेसरशीं ते एकदम धांव घेतात; आपल्या शरीराची आणि सुखाची त्यांना विस्मृति पडते; आपत्तींचा वर्षाव होत असतांहि ते पुढें घुसण्याला कचरत नाहींत; आणि प्रत्यक्ष मृत्यूलाहि कवटाळण्यांत त्यांना आनंदच लाभतो. या महापुरुषांच्या जीवनांत जी ज्वलंत श्रद्धा प्रकट होते ती जेव्हां सामान्य लोकांच्या हृदयाला स्पर्श करिते त्या वेळीं त्यांचें सर्वांग थरारून जातें. आपल्या दुर्बलतेचा त्यांना क्षणभर विसर पडतो, आणि एका नवीन शक्तीचा आलंब लाभल्यासारखें होतें. सामान्य जीवनांतून बाहेर

काढून त्यांना असामान्य जीवनांत नेऊन ठेविल्याचा साक्षात्कार होतो. महाकवींच्या या क्रियेलाच भवभूतीनें 'करुणरस' अशी संज्ञा दिली आहे. हाच जीवनांतील प्रधानरस होय. इतर रसांचे प्रवाह शेवटीं याच महाप्रवाहाला येऊन मिळतात आणि कृतार्थ होतात. जगांतील साऱ्या महाकवींच्या सर्वश्रेष्ठ कृतींत याच करुणरसाचा आस्वाद चाखा-वयास मिळतो. याला करुण म्हणण्याचें कारण असें दिसतें कीं, उदात्त जीवनाची आकांक्षा उत्पन्न झाली कीं लौकिक जीवनाला महत्त्व राहात नाहीं. लौकिक सुखांचा त्याग करून अलौकिक दुःखांचा अंगीकार करण्याची वृत्ति बळावते. सामान्य मनाला या प्रक्रियेनें विलक्षण वेदना होतात आणि सत्यार्थी पुरुषाला लौकिक सुखांचा लाभ कां होऊं नये, याचा त्या मनाला उलगडा होत नाहीं. म्हणून जीवनांतील उदात्ततेला कारुण्यानें ग्रासिलें आहे अशी समजूत रूढ झाली आहे. वस्तुतः हें कारुण्य म्हणजे केवळ जीवनाची गभीरताच होय. त्यामुळेंच जीवनाचा परम अर्थ प्रत्ययास येतो. अरिस्टॉटल्नें ट्रॅजेडीमुळें हृदयशुद्धि (Catharsis) होतें असें म्हटलें आहे तें याच अर्थानें. करुणरसानें आनंद कां होतो याचा उलगडाहि आतां सहज होण्यासारखा आहे. करुणरसाच्या क्रियेमुळें गभीर शांतीची उपलब्धि होते. आत्म्याचा विशुद्ध आनंद त्या शांतींतच सामावलेला असतो. आध्यात्मिक दृष्टीनें याची सरळ उपपत्ति लागते. या भौतिक सृष्टीचें स्वरूप आपाततः कितीहि आकर्षक वाटलें, तरी तें आत्म्याच्या आकांक्षांना सर्वतोपरी अपुरें आणि असमाधानकारक आहे. सान्ताच्या बंधनांत सांपडलेल्या अनंतामध्यें आपलें यथार्थ स्वरूप प्रकटविण्याची प्रेरणा जागृत होते. ही प्रेरणाच जीवनाची मुख्य चालकशक्ति आहे. हिचा प्रथम आविष्कार भौतिक सुखांच्या वासनेंत होतो; पण भौतिक सुखांची प्राप्ति झाली तरी ही प्रेरणा शांत होत नाहीं. मानसिक, बौद्धिक इत्यादी एकाहून एक वरचढ असलेल्या क्षेत्रांत ती नवीन नवीन ध्येयें सिद्ध करण्याला प्रवृत्त होते.

पण एवढ्यानेंहि तिची संपूर्ण तृप्ति होत नाहीं. सान्ताचे सर्व पाश तोडून संपूर्णतया उन्मुक्त झाल्याशिवाय या प्रेरणेला संपूर्ण समाधान व्हावयाचें नाहीं. म्हणून ही प्रेरणा जीवनाला गंभीर आणि उदात्त बनवीत नेहमींच सान्ताच्या पुढें धांव घेत राहाते. त्यांतच तिचा आनंद भरलेला असतो. ही प्रेरणा सामान्यतः 'आध्यात्मिक ध्येयवाद' या नांवानें सर्वत्र परिचित झालेली आहे. महाकवींच्या साहित्यांत हाच आध्यात्मिक ध्येयवाद निरनिराळ्या स्वरूपांनीं रंगविलेला आढळतो. महाकाव्य हें कांहीं श्लोकांच्या संख्येवर अथवा पात्रांच्या विविधतेवर अवलंबून नाहीं. समग्र जीवनाची ध्येयकल्पना ज्यांत प्रकटली तें महाकाव्य या नांवाला पात्र झालें. 'जीवनयोगा'चे पहिले चार खंड उदात्ततेनें भरलेले आहेत. पण शेवटल्या भागांतील ध्येयकल्पनेनें त्याला जी एक विशालता प्राप्त झाली आहे त्यामुळें त्याला महाकाव्याच्या क्षेत्रांत दाखल करावयास हरकत नाहीं. प्रेमानें वीरकर्मांची जागृति दिली, आणि ध्येयासाठीं आत्मबलिदान करण्यांतच जीवनाचें सर्व सुख सांठविलेलें आहे अशी प्रतीति आणून दिली. पण हें बलिदान ज्या ध्येयासाठीं करावयाचें तें ध्येयहि अशा बलिदानाला शोभेल इतकें विशाल आणि उदात्त असलें पाहिजे. जीवनयोगाच्या अखेरीस असें विशाल ध्येय कवीनें सूचित केलें असल्यामुळें या काव्याला महाकाव्याचें वैभव प्राप्त झालें आहे.

'जीवनयोगा'चे लेखक श्री. ना. ग. जोशी हे एक पंडित-कवि आहेत. पांडित्याचा कवित्वाशीं विरोध असलाच पाहिजे असा कांहीं नियम सांगतां येणार नाहीं. संस्कृतांतील बहुतेक महाकवी महापंडितच होते. मिल्टन, गटे यांच्यासारखे पाश्चात्य कवी, ज्ञानेश्वर-एकनाथ, वामन-मोरोपंत यांच्यासारखे प्राचीन मराठी कवी हे सर्व पंडितच होते. महाराष्ट्रांतील आधुनिक कवींतहि माधवराव पटवर्धन, 'भग्नमूर्ति'कार देशपांडे इत्यादिकांना पंडित-कवी म्हणतां येईल. या पंडित-कवींच्या पांडित्यामुळें त्यांच्या काव्याला उणेपणा

आल्याचें कोठेंच दिसत नाहीं. उलट त्यांच्या काव्याला त्यांच्या पांडित्यामुळें अभिजात संस्कार लाभलेले दिसतात. रत्नाचे पैलू पाडिले म्हणजे जसें तें अधिक चमकदार होतें त्याप्रमाणें बुद्धीला पांडित्याचे पैलू पडले असतां प्रतिभेचें तेज अधिक फाकतें. पांडित्य आणि कवित्व या दोन स्वतंत्र शक्ती आहेत. म्हणून त्या नेहमींच एकत्र आढळतील असें मात्र नाहीं. पण त्या परस्परविरोधी नाहींत; परस्परांना पोषकच आहेत.

'काव्येषु कोमल-धियो वयमेव नान्ये
तर्केषु कर्कश-धियो वयमेव नान्ये'

ही जगन्नाथरायाची दर्पोक्ति तत्त्वतः पंडित-कवींचें यथार्थ स्वरूप व्यक्त करणारी आहे. विज्ञाना (Science) ची वाढ देखील काव्याला मारक होणें शक्य नाहीं. कारण विज्ञानाचा संबंध विश्वाच्या भौतिक स्वरूपाशीं असून काव्याचा संबंध विश्वाच्या आत्मिक स्वरूपाशीं असतो. तर्काला पृथक्करण करतां येतें पण एकत्वाचें दर्शन घेण्याचें कार्य भावनेलाच शक्य आहे. म्हणूनच विज्ञानवेत्तेहि कवित्वशक्तीनें संपन्न आढळतात. 'जीवनयोगा'वर पांडित्य आणि विज्ञान या दोघांचीहि दाट छाया पडलेली आढळते. पण त्यामुळें काव्याचें सौंदर्य वृद्धिंगत झालें आहे. संस्कृतांतील कालिदास, इंग्रेजींतील मिल्टन आणि मराठींतील सावरकर या तीन भिन्न प्रकारच्या कवींचा 'जीवनयोगा'वर परिणाम झालेला दिसून येतो. मिल्टनच्या 'Paradise Lost' या काव्याच्या कांहीं भागाचा 'नष्टनंदन' या नांवानें त्यांनीं केलेला मराठी काव्यानुवाद 'महाराष्ट्र साहित्य पत्रिकें'त प्रसिद्ध झाला आहे. कालिदासाचें कलाचातुर्य, मिल्टनची तत्त्वपरायणता आणि सावरकरांची भावनोत्कटता या तीनहि गुणांचें कांहीं अंशानें 'जीवनयोगां'त मीलन झालेलें आहे. पांडित्यामुळें क्लिष्टता उत्पन्न होते अशी पुष्कळ लोकांची समजूत आहे. खरोखर, क्लिष्टता हा पांडित्याचा दोष नसून पांडित्य दाखविण्याच्या मोहामुळें उत्पन्न होणारा दोष आहे. हा दोष

'जीवनयोगां'त आढळत नाहीं. क्वचित् दुर्बोधता भासेल, पण पांडित्य हें त्या दुर्बोधतेचें कारण नव्हे. कवीची प्रतिभा जितक्या अंशानें अपरिपक्व असते तितक्या अंशानें त्याच्या कृतींत दुर्बोधता उतरते. 'जीवनयोग' ही कवीची पहिलीच कृति असल्यामुळें त्यांत प्रतिभेची अपरिपक्वता दुर्बोधतेच्या रूपानें पाहावयास सांपडली तर त्यांत विशेष आश्चर्य नाहीं. तथापि या काव्यांतहि उत्तरोत्तर दुर्बोधतेचें प्रमाण कमी होत गेलें आहे ही आनंदाची गोष्ट आहे. 'जीवनयोगां'त प्रौढत्व, उदारता आणि अर्थगौरव हे भवभूतीनें कवित्वाला आवश्यक म्हणून सांगितलेले गुण बऱ्याच मोठ्या प्रमाणावर आढळतील. शब्दांची योजना करण्यांत कवीनें कृपणता दाखविली आहे असाहि रसिकांचा आक्षेप येऊं शकेल; पण पाल्हाळाचा आरोप कोणालाच करितां येणार नाहीं. भावना हाच कवित्वाचा प्राण होय. 'जीवनयोगां'त हा प्राण सर्वत्र भरून राहिलेला आढळेल. विज्ञानाचा उपयोग करून कित्येक ठिकाणीं मनोहर कल्पना उभारलेल्या दृष्टीस पडतील. उत्तरध्रुवावरून दिसणाऱ्या 'व्यजनाकृति उषे'चें वर्णन हें या प्रकारचें एक उदाहरण म्हणून सांगतां येईल. यामुळें काव्याला ताजेपणा लाभला आहे. रसानुकूल शब्दांची आणि वृत्तांची रचना करण्यांत तर कवीचा हातखंडाच आहे. यामुळें 'जीवनयोग' या काव्याला महाराष्ट्रांतील पंडितकवींच्या काव्यमालिकेंत मानाचें स्थान मिळेल अशी मला खात्री आहे.

तथापि 'जीवनयोगा'चें खास वैशिष्ट्य म्हणजे त्यांत व्यक्त झालेला विशाल स्वरूपाचा सामाजिक ध्येयवाद. आधुनिक काळीं महाराष्ट्राच्या काव्यसाहित्यांत 'केशवसुतां'नीं सामाजिक ध्येयवादाची 'तुतारी' प्राणपणानें प्रथम फुंकली. अवकाशाच्या ओसाडींतील मुक्या पडसादांना वाचाळ करण्याचा त्यांनीं पहिला प्रयत्न केला. गत शतकांचीं घोर पापें क्षालन करण्यासाठीं आपलीं रुधिरें देण्याला त्यांनीं आवाहन केलें. आणि ओजाचा अभिनव बाणा प्रकटविला. समतेचा ध्वज उंच धरून आपण शांतीचें साम्राज्य सर्व विश्वावर स्थापन करणाऱ्या नव्या

मनूंतील 'नवा शिपाई' असल्याचें त्यांनीं घोषित केलें. या महनीय कार्यामुळें केशवसुतांना 'मराठी काव्यांतील नवयुगप्रवर्तक' अशी सार्थ पदवी मिळाली. केशवसुतांचें हें ध्येयस्वप्न अद्यापि मूर्तावस्थेला आलें नसल्यामुळें केशवसुतांचें कार्य अद्यापि अपुरेंच राहिलें आहे. या ध्येयस्वप्नाच्या सिद्धतेसाठीं सामाजिक जीवनांत असंख्य क्रांतिकारक निर्माण झाले पाहिजेत. त्यासाठीं साहित्यानें समाजाचें सतत मार्गदर्शन करीत राहिलें पाहिजे. महाराष्ट्रांत अलीकडे केशवसुतांची महती नाकारण्याचाच प्रतिगामी प्रयत्न सुरू झालेला दिसतो. काळाबरोबर पुढें जाण्याचें सामर्थ्य उरलें नाहीं म्हणजे प्रतिगामी संप्रदाय निर्माण होतात. आजच्या मराठी साहित्यांत केशवसुतांचा सामाजिक ध्येयवाद मागें पडून विलासिता, जातीयता, प्रांतीयता इत्यादी रोगट प्रवृत्तींचा प्रादुर्भाव झाल्याचें दिसत आहे.

'ब्राह्मण नाहीं, हिंदुहि नाहीं, न मी एक पंथाचा,
तेच पतित कीं जे आंखडिती प्रदेश साकल्याचा !

खादाड असे माझी भूक,
चतकोरानें मला न सूख;
कूपांतिल मी नच मंडूक;

मळयास माझ्या कुंपण पडणें अगदीं न मला साहे !

हे केशवसुतांचे उद्‌गार आजच्या संकुचित साहित्याच्या घोषांत बुडून जातात कीं काय, अशी भीति उत्पन्न झाली आहे. या वेळीं 'जीवनयोगां'तील

समग्र मानव्य धरून चिंतनीं
चराचरीं देखुन एकरूपता,
न जोंवरी आंतरराष्ट्र-जीवनीं
सहिष्णुता तोंवरि कैंवि शांतता ?

* * *

समग्र अंगीं निज जीवनांतल्या
उपायसंयोजन ना जरी करी,
न साधणें त्या नवनिर्मिती कधीं
समाजजीवीं नरजातिला तरी !

जगांत नांदेल समृद्धिशांतता
न शांतिचा केवळ मंत्र गाउनी;
न साधितां जीवनिंच्या समन्वया
कशी वसावी समतोलता जनीं ?

जधीं 'अनासक्त' असंख्य शंकर
सुसिद्ध कंठीं विषदाह साहण्या—
तधींच हा जीवनयोग शक्य हो
करावया ध्येयसमान साधना !

या श्लोकांत उद्घोषिलेला सामाजिक ध्येयवाद विशेष आश्वासनपर आहे असें मला वाटतें. साने गुरुजींचें काव्य क्षणभर बाजूस ठेविलें तर केशवसुतांनंतर, मला वाटतें, इतका विशुद्ध सामाजिक ध्येयवाद शुद्ध साहित्यिकाकडून महाराष्ट्रांत प्रथमच काव्यबद्ध होत आहे. 'जीवनयोगा'चे लेखक श्री. ना. ग. जोशी हे नव्या पिढीचे प्रतिनिधि समजले तर महाराष्ट्राच्या साहित्यक्षेत्रांत यापुढें केशवसुतांचा संदेश नवस्वरूपानें निनादित होत राहील अशी आशा बाळगण्यास हरकत नाहीं. नवमहाराष्ट्रानें 'जीवनयोगा'चें या दृष्टीनें उत्साहानें स्वागत करावें अशी माझी इच्छा आहे.

अल्डस् हक्स्ले (Aldous Huxley), रोमां रोलाँ (Romain Rolland) आणि महात्मा गांधी या तिघांच्या तात्त्विक विचारांचा समन्वय म्हणजेच 'जीवनयोगां'तील सामाजिक ध्येयवाद होय.

अल्डस् हक्स्ले हा आधुनिक इंग्लंडांतील प्रख्यात शांततावादी साहित्यकार आहे. भौतिक, सामाजिक आणि आध्यात्मिक शास्त्रांचा त्याचा जबरा व्यासंग असून आधुनिक संस्कृतीच्या सर्व अंगांचें त्याला प्रत्यक्ष ज्ञान आहे. त्याच्या जीवनांत त्यानें अनेक स्थित्यंतरें अनुभविलीं आहेत. आपल्या सर्व अनुभवांचें, विचारांचें आणि प्रयोगांचें सार त्यानें आपल्या 'Ends and Means' या सुप्रसिद्ध ग्रंथांत नमूद केलें आहे. 'विशाल ध्येयांच्या सिद्धीसाठीं साधनांची शुद्धि करावी लागते' हा त्याचा मुख्य सिद्धांत आहे. जीवनाच्या विकासासाठीं जीवनांतील सर्व अंगांची एकसमयावच्छेदेंकरून सुधारणा घडवून आणिली पाहिजे हा त्याचा विशेष आग्रह आहे. कोणत्याहि सामाजिक क्रांतींत हिंसा वर्ज्य मानिली पाहिजे अशी त्याची खात्री झाली आहे. गीतेंत वर्णिलेला 'अनासक्त स्थितप्रज्ञ' हाच मानव्याचा परम आदर्श त्यानें स्वीकारला आहे. पण या आदर्शाला सामान्य जनता एकदम पोंचणें शक्य नसल्यामुळें जनतेचे अर्थकामविषयक प्रश्न स्थितप्रज्ञांनीं शुद्ध साधनांचा उपयोग करून सोडवून दाखविले पाहिजेत, तरच समाजांत शांति नांदेल आणि जीवनाची ध्येयदिशेनें प्रगति होत राहील, असा त्याचा विचार-निष्कर्ष आहे.

रोमां रोलाँ यांचा अधिकार लोकविश्रुतच आहे. टॉल्स्टॉयच्या विचारांपासून स्फूर्ति घेऊन टॉल्स्टॉय यांच्या पश्चात् यांनीं अखिल युरोपांत मानवप्रेमाची ध्येय-ज्योति आजवर प्रज्वलित ठेविली आहे. १९१४ ते १९१८ च्या पहिल्या युरोपीय महायुद्धांत यांनीं युद्धाच्या पाशवी वृत्तीचा तीव्र निषेध केला. त्यासाठीं आपल्या मायदेशाचा —फ्रान्सचा—हि त्याग केला. 'युरोपांतील थोर संन्यासी' या शब्दांनीं रवीन्द्रनाथ ठाकूर यांनीं सुमारें वीस वर्षांपूर्वी त्यांचा गौरव केल्याचें प्रसिद्धच आहे. रोमां रोलाँ हे थोर साहित्यकार, संगीतज्ञ, तत्त्वज्ञानी आणि साक्षात्कारी (mystic) पुरुष आहेत. अखिल मानवजातीवर यांचें प्रेम असल्यामुळें यांचा सामाजिक ध्येयवाद गोऱ्या लोकांपुरता

कधींच मर्यादित नव्हता. रामकृष्ण, विवेकानन्द, महात्मा गांधी, अरविन्द, रवीन्द्रनाथ यांच्या विचारांचा खोल अभ्यास करून त्यांनीं त्यांच्यासंबंधीं महत्त्वाचें लेखन केलें आहे. म. गांधी आणि रवीन्द्रनाथ यांच्याशीं त्यांचा प्रत्यक्ष स्नेहसंबंध असल्याचें प्रसिद्धच आहे. जॉन क्रिस्तोफर (John Christopher) या ध्येयवादी कादंबरीमुळें त्यांना नोबेल प्राईझहि मिळालें आहे. रोमां रोलाँचा मुख्य विशेष म्हटला म्हणजे ध्येयात्मक क्रियावाद. 'Never divorce action from thought' हा त्यांच्या ग्रंथांचा मुख्य संदेश आहे. 'I Will not Rest' या आपल्या सर्वश्रेष्ठ ग्रंथांत त्यांनीं आपल्या विचाराचा विकास कसकसा होत गेला त्याचा संपूर्ण इतिहास निवेदन केला आहे. समाजांत ध्येयवादाच्या गोंडस नांवाखालीं भयानक अन्याय आणि हृदयविदारक विषमता हे दोष कसे लपून राहिलेले असतात आणि भल्या भल्या ध्येयवादी पुरुषांचीहि त्यामुळें कशी दिशाभूल होते, याचें त्यांनीं स्वतःचे अनेक अनुभव देऊन मार्मिक विवरण केलें आहे. मानव-संस्कृतीचीं चिरंतन मूल्यें अबाधित राखण्यासाठींच भांडवलशाही संस्कृतीचा यापुढें विनाश झाला पाहिजे आणि त्यासाठीं कम्युनिस्ट क्रांतीला पाठिंबा दिला पाहिजे असा त्यांचा निर्णय झाला आहे. त्यांनीं अनेक आपत्ती सोसून इटलींतील फॅसिझम् आणि जर्मनींतील नाझीझम् या संस्कृतिघातक विचारसंप्रदायांना कसून विरोध चालविला आहे. त्यांना म. गांधींचा अहिंसक क्रांतिवाद तत्त्वतः पसंत आहे. तथापि फॅसिझम्—नाझीझम् यांच्याशीं यशस्वी झुंज घेण्याला युरोपांतील आजच्या देशांनीं हिंसेचाहि आश्रय केला पाहिजे, असे विचार त्यांनीं चालू महायुद्धाच्या प्रारंभीं व्यक्त केले होते.

म. गांधींचें तत्त्वज्ञान आपल्यासमोरच आहे. शेले, टॉल्स्टॉय, रवीन्द्रनाथ इत्यादी महाकवींनीं आपल्या प्रतिभाबलानें आकलिलेला आणि साहित्यांत वर्णिलेला आध्यात्मिक बलवाद गांधीजींनीं प्रत्यक्ष राजकारणांत आणून उभा केला. गेल्या पन्नास वर्षांत दक्षिण

आफ्रिका आणि हिंदुस्थान या ठिकाणीं त्यांनीं सत्याग्रहाचे जे अनेक संग्राम केले त्यांतून अहिंसेचें एक नवें क्रांतितंत्रच निर्माण झालें आहे. मानवजातीच्या संस्कृतिरक्षणासाठीं न्याय्य-अन्याय्य, आक्रमक-संरक्षक इत्यादी सर्व प्रकारच्या हिंसात्मक युद्धांचा संपूर्ण परित्याग केला पाहिजे, ही गांधीजींची भारताच्या द्वारा सर्व जगांतील मानवजातीला शिकवण आहे. सामान्य जनतेला आजपर्यंतच्या इतिहासांत आपल्यावरील अन्यायांविरुद्ध झगडण्याचें शिक्षण कोणीच दिलें नव्हतें. सामान्य जनतेच्या वतीनें ठिकठिकाणीं सशस्त्र क्रांत्या झाल्या. पण सामान्य जनता स्वतंत्र होण्याऐवजीं त्या त्या शस्त्रधारकांच्याच जुलमाला तिला बळी पडावें लागलें. या इतिहासापासून बोध घेऊन गांधीजींनीं सामान्य जनतेला स्वतःच्या प्रयत्नानेंच आपल्यावरील अन्यायांविरुद्ध झगडण्याचें तंत्र शिकविलें. या तंत्रानें भारतीय राजकारणांत अद्वितीय यश मिळविलें आहे. भारतीय स्वातंत्र्यासाठीं याच तंत्राचा सर्व क्रांतिकारक वृत्तीच्या लोकांनीं स्वीकार केला आहे; आणि सध्यांच्या जागतिक महायुद्धाच्या काळांतहि भारताला याच तंत्रानें आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठीं निर्भयतेनें उभें राहण्याचें सामर्थ्य दिलें आहे. स्वतंत्र भारतानेंहि याच तंत्राचा स्वीकार करून जगांतील दलित मानवतेला मुक्त करावें अशी गांधीजींची इच्छा आहे.

अल्डस् हक्स्ले, रोमां रोलाँ आणि म. गांधी यांच्या विचारांचा समन्वय 'जीवनयोगां'त शेवटीं सूचित केला आहे तो खरोखरच चिंतनीय आहे. हक्स्लेचा समग्र जीवनाचा सुधारणावाद हा जीवनाच्या मूलभूत एकतेवर आधारलेला आहे. Rudolph Eucken या प्रख्यात जर्मन तत्त्ववेत्त्याचें 'Man is the meeting-point of various stages of Reality' असें एक प्रसिद्ध वचन आहे. सद्वस्तूचे विविध अंश मानव-जीवनांत संमीलित झाले आहेत हा जगांतील सर्व ज्ञात्यांचा एकमेव सिद्धांत आहे. जीवनसत्याचा शोध घेणाराला मानव-जीवनाच्या सर्व विभागांची पाहणी केलीच पाहिजे.

त्याला एकदेशी बनून चालणार नाहीं. म्हणून राजकीय स्वातंत्र्य आणि आर्थिक समता, शैक्षणिक विकास आणि आध्यात्मिक बंधुभाव, भौतिक सुखें आणि आत्मिक शांति, उपयुक्ततेचे श्रम आणि विश्रांतींतल्या कला इत्यादी जीवनाच्या विविध मूल्यांचा अनुबंध साधून जीवनयोग निर्मिला पाहिजे. अशा अनुबद्ध योगांतच जीवनाचें सत्य वास करीत असतें. या सत्याचें सगुण स्वरूप म्हणजेच न्याय. यांतच जीवनाचें हित सामावलेलें असतें.

'यद्भूतहितमत्यन्तं तत्सत्यमिति धारणा'

या महाभारतांतील सुप्रसिद्ध वचनांतहि सत्य आणि हित यांचा अभेद वर्णिला आहे. या जीवनसत्याचा शोध घेणें हें मानवी बुद्धीचें प्रधान प्रयोजन आहे. अरिस्टॉटल्नें प्रतिपादिलेला 'Golden mean', हेगेलचा 'Synthesis' आणि बादरायण-शंकराचार्यांचा 'समन्वय' या सर्वांचा अर्थ एकच आहे. जीवनसत्य हें जीवनाचें साकल्यानें दर्शन करून देणारें सत्तत्त्व होय. अल्डस् हक्स्लेनें या जीवनसत्याचाच आधुनिक परिभाषेंत पुनरुच्चार केला आहे. पण हें जीवनसत्य निवळ बुद्धिगम्य असत नाहीं. जीवन हें अखंड गतिमान् असल्यामुळें जीवनाचें संपूर्ण सत्य शोधणाऱ्या साधकाला जीवनाच्या गतिमत्तेशीं समरस व्हावें लागतें. 'Activity is the only road to knowledge' हें बर्नार्ड शॉ यांचें शिक्षणविषयक सूत्र जीवनांतील सर्वच ज्ञानाला लागू आहे. 'क्रियेनें ज्ञान होतें आणि ज्ञानानें ज्ञेय वस्तूंत बदल घडून येतो' ही कार्ल मार्क्स्नें प्रतिपादिलेली ज्ञान-प्रक्रिया जीवनांत दुर्लक्षून चालणार नाहीं. 'तत्त्वज्ञान्यांनीं विश्वाचा अर्थ समजावून सांगितला; आम्ही तें विश्व बदलणार आहोंत' या मार्क्स्च्या वचनांतहि ज्ञानाचें क्रियात्मक प्रयोजन स्पष्ट झालें आहे. म्हणून जीवनसत्य जाणण्यासाठीं आपणांला रोमां रोलाँ यांनीं सांगितल्याप्रमाणें विचाराशीं क्रियेची काडीमोड करून चालावयाचें नाहीं. प्रवृत्तिपरता हाच जीवनसत्याकडे जाणारा एकमेव मार्ग आहे. मात्र ही प्रवृत्ति समाजनिष्ठ असली पाहिजे.

केवळ व्यक्तिनिष्ठ असून चालणार नाहीं. जीवनांतील ही क्रिया अथवा प्रवृत्ति जीवनसत्याच्या अंतिम स्वरूपाशीं— आध्यात्मिक मूल्यांशीं–संपूर्ण अनुसंधान राखून घडविली तरच ती जीवनाला सफल करूं शकेल. त्यासाठीं साध्याचे सारे गुण साधनांत अंतर्भूत केले पाहिजेत. जीवनसत्याकडे नेणारी जीवन-साधना म्हणजेच महात्मा गांधींचा अहिंसात्मक सत्याग्रह होय. आजच्या विश्वांत जीवनाचा संपूर्ण योग सामुदायिक प्रमाणावर आचरणांत आणण्याचा प्रयत्न फक्त म. गांधीच करीत आहेत, याची बौद्धिक प्रतीति अखिल महाराष्ट्राला व्हावी अशी माझी फार इच्छा आहे. 'जीवनयोग' या बौद्धिक प्रतीतीला साह्यकारी होईल अशी माझी अपेक्षा आहे. स्वातंत्र्य-दिनाच्या शुभ मुहूर्तावर हें काव्य महाराष्ट्राच्या हातीं पडत आहे हा मी शुभ योग समजतों.

आश्रम सासवड,
स्वातंत्र्यदिन, १९४२

—स. ज. भागवत

भूमिका

'जीवनयोग' ही एक भावकथामय कविता आहे. कथानक केवळ सूत्ररूपानें निरनिराळ्या प्रसंगांना गुंफून घेण्यापुरतेंच आहे. आंतील भावना याच मुख्य चित्रणाचा विषय आहेत.

नायक 'विजय' आपल्या तोंडानें ही सर्व हकिकत घडल्यानंतर कांहीं वर्षांनीं सांगत आहे. त्या दृष्टीनें पहिले चार भाग—**संदेश**, **मंत्रणा**, **बंदिवास** व **दर्शन**—यांचा एक कालखंड आणि शेवटच्या **जीवन-योगाचा** पुढील खंड, असे दोन खंड यांत पडतात. जगांतील मानवी व्यवहारांतील कोडें सर्वांनाच गुंगवून टाकीत आहे. नायक 'विजय' हा तर कृतिशील आहे, तो समष्टिवादी कर्मयोगी आहे. त्यामुळें मानव्याची ही अगतिक–किंवा परागतिक–स्थिति पाहून त्याच्या मनाला यातना होतात आणि मग तो आपले स्फुरलेले विचार लोकांना सांगूं पाहतो, व तसें करितांना स्वतःच्या जीवनांतील ठळक प्रसंग तो वर्णन करितो. अशा तऱ्हेनें व्यक्तीचा–'विजया'चा–जीवनयोग आणि समष्टीचा–जगताचा–जीवनयोग यांतील अनुबंधाचीं मूल्यें तो सुचवीत आहे. सध्यांची 'विजया'ची तात्त्विक भूमिका अल्डस् हक्स्लेनें Ends and Means मध्यें अपरिहार्य म्हणून आवश्यक दाखविलेला समग्र जीवनाचा सुधारणावाद, रोमां रोलाँचा ध्येयमय क्रियावाद आणि म. गांधींचा आध्यात्मिक बलवाद यांच्या (मनोवृत्तीप्रमाणें स्वाभाविक तेवढ्या प्रमाणांत) समन्वयानें बनलेली आहे. त्याला तीच युक्त वाटते; म्हणून तर त्यानें ती सांगण्याचा हिय्या केला आहे.

आंतील चिंतनाची ही भूमिका आहे. ती सर्वांनाच सारखी पटेल हें शक्य नाहीं—आणि काव्य म्हणून तिचा बाऊ करण्याचेंहि कारण नाहीं. 'विजय' आणि त्याची समानशील पत्नी 'शांता' यांच्या जीवनांतील ही विचारसरणी जरी आवडली नाहीं तरी तिच्यामागील तीव्र भावना आणि तिचें चित्रण जर हृदयंगम असतील तर 'कवी'नें आपलें काम केलें. तें कितपत साधलें आहे तें रसिकदृष्टीनें वाचकांनींच ठरवावें. सुबुद्ध मर्मज्ञांचें मत हेंच या बाबतींतील अखेरचें मत, असें मला वाटतें.

१९३१ ते १९४१ पर्यंतच्या दहा वर्षांत निरनिराळ्या अवस्थांतून हें काव्य गेलें आहे. त्यावर निरनिराळ्या महाकवींच्या कृतींची दाट छाया पडली आहे. त्याप्रमाणेंच विचारामध्येंहि अनेक प्रकारचे प्रवाह मिसळून शेवटच्या 'जीवनयोग' भागांत ते एकरूप झाले आहेत. त्यामुळें हें काव्य महाकाव्य किंवा महाविचार म्हणून मानलें जाईलच असें नाहीं. एक गोष्ट मात्र झालेली दिसेल; ती म्हणजे पहिल्यामुळें आलेलें रचनेंतील पांडित्य आणि दुसऱ्यामुळें आलेला विचारांतील आत्यंतिक ध्येयवाद होय. पण त्या पांडित्याचें—क्लिष्टतेचें म्हणा पाहिजे तर—समर्थन करणें अनावश्यक आहे. तें आहे यांत शंका नाहीं; किती प्रमाणांत आहे तें सुज्ञ वाचकांनीं ठरवावें. विचारविषयक ध्येयवादित्वाबद्दल एवढें सांगितलें पाहिजे कीं, तें ज्यांना पटेल त्यांनीं त्याचें विश्लेषण करावें; न रुचेल त्यांनीं त्याला सोडून द्यावें. त्यामध्यें कवि 'उदासीन' वृत्तीनेंच वावरत आहे.

या पुस्तकाच्या प्रकाशनासाठीं श्री. र. ग. जोशी आणि प्रकाशक श्री. मा. रा. देशपांडे यांनीं केलेल्या अमोल साह्याचा साभार उल्लेख करणें त्यांना आवडलें नाहीं तरी अवश्य आहे. आचार्य भागवतांचे आभार मानणें म्हणजे शब्दांवर न झेपणारी जबाबदारी टाकणें आहे. मी त्याबाबत मौन स्वीकारतों. काव्याच्या हस्तलिखितांत 'लोकशिक्षण'कारांनीं सूचना केल्यावरून रसिकवर्य डॉ. श्रीखंडे यांनीं ज्या कांहीं सुधारणा सुचविल्या त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें. 'जीवनयोगा'चा अंताचा भाग 'महाराष्ट्र साहित्य पत्रिके'च्या जुलै १९४१ च्या अंकांत प्रसिद्ध झाला होता. त्याबद्दल संपादक श्री. के. नारायण काळे यांचा मी ऋणी आहें.

स्वातंत्र्यदिन, १९४२
भारती विद्यालय,
खाडिया, अहमदाबाद

—ना. ग. जोशी

अनुक्रमणिका

१ सन्देश	...	...	१
२ मन्त्रणा	...	...	१०
३ बन्दिवास	...	...	१८
४ दर्शन	...	...	२८
५ जीवनयोग	...	...	३४
परिशिष्ट १ लें	...	...	४३
परिशिष्ट २ रें	...	...	४४

पाशवी युद्धाच्या सर्वभक्षक ज्वालेंत जळून खाक होणाऱ्या

अपराधी आणि निरपराधी

मानव्याला

अर्पण

— ना. ग. जोशी

१

सन्देश !

*अस्तगिरीच्या आड विभाकर जातां,
सन्ध्या वितरे जशी भूवरी क्रान्ता—
तशीच शान्ता मत्प्रियकान्ता येअी
अुद्यानान्तरिं विकलमना दिनअन्ता !

वसन्तलक्ष्मी अुद्यानासह रमते,
गुलाब हे आरक्त गालिं खुलवीते,
अन् हास्याची कोर खुले अधरांत
चन्द्ररूप जी नभःप्रदेशीं घेते;

आणि कुचद्वय अुरःस्थला भूषवितें;
डोकावुनि कञ्चुकींतुनी लव हंसतें
कुठें ? न दिसतें तुम्हां समोर सलील—
पर्णकञ्चुकींतुनी रसाल युगल तें ?

* जाति : वंशमणि

तुषारमय करि विरल वस्त्र परिधान,
फुलवेलींचें सुन्दर कशिदाकाम;
नानारङ्गीं रङ्गविली सुमशोभा
जाअि-जुअी-शेवती नि चम्पक स्वर्ण !

मटुनी थटुनी नखरे कितितरि करिते;
नाचत पवनासङ्गें मन्जुल गाते;
कोकिलकण्ठा सुरेल घेतां ताना
साध्याभोळ्या हरिणींना भुलवीते !

हरिणीगमना हरिणीजनतनुगात्री;
मृगाङ्कवदना मृगसमतरला नेत्रीं
स्तम्भित भुलवुन केली, विसरे स्वात्मा
शान्ता लिखिता भासे मोहक चित्रीं;

गानसमाधी लागे, नोळखि जगता;
प्रियपदनादहि ना भिडतो तच्चित्ता
हळुंच जाअुनी अुभें राहतां मागें
हृदय थरारे...दृश्य दृष्टिला पडतां;

शिळेवरी कारन्जासन्निध बसली,
जलाशयावरि चन्चल दृष्टी खिळली;
पाही पडछाया कुणि कोमल काया
कोर बिजेची मावळतीला कलली !

तुषारमाला वरी वरी अुडताती—
आकाङ्क्षा जणुं स्पर्धा खेळत असती;
परी परतती अन्तीं विकला विफला
मूळपदीं पावती पुनर्विश्रान्ति !

लोभनीय संयोग समसमां झाला
मुग्ध कोर आकर्षी लुब्धा बाला;
मुन्दरतेवरि सौन्दर्याची ओढ
नैसर्गिक हा नियम असे ठरलेला !

किती प्रियेची अेकतानता झाली;
श्रवणीं कसल्या अितुकी गुङ्ग जहाली ?
मला न येअी अैकूं मुळिंही कांहीं !
मग कां अितुकी लक्ष लावुनी बसली ?

हां ! ही कोरच मूकभाव दर्शविते,
अधिकतरा सुन्दरा गोडशी हंसते;
स्त्रीहृदयाला स्त्रीहृदयाचे भाव
मूक जरी अुकलती सहज सर्वहि ते ! ४८

* *

“ कृशीकृता मी तरी कशी हर्षांत ? ”
असें पृच्छिसी पडोनियां नवलांत !
अैक, गडे, ती कथा जपुनि ठेवियली,
रत्नासम मीं हृद्रत्नकरण्डांत ! !

रत्नोत्पादन समुद्रमन्थन होतां
मुरा सुरारी सुखद समजुनी घेतां;
‘मुरलीमोहन’ मोहनरूपा धरुनी
सरणन्नूपुर सुररङ्गीं अवतरतां —

प्रभाकराची प्रभा प्रकाशविहीना;
सोम सकल कलनादीं विसरे भाना;
जरि मृदुलकरीं स्वर्ण सुधाचषक धरी
तरि आर्त करी अधरसुधारसपाना ! !

अन्यकरीं पळि चपलामयशी चमके;
प्रतिपात्रीं वाढीत क्षणभर थबके;
        जणुं वासन्ती अर्पि मधुकरालागीं
कमलकर्णिकामृत मधुमासांत निकें ! !

तों सहजीं दृष्टीस विधूच्या पडलें—
अेक्या असुरें छद्मरूप धरलेलें ! !
        मोहनेस खुणवितो, “ असुर हा साच, ”
सुदर्शनें तों क्षणांत मस्तक अुडलें !

तेव्हांपासुनि राहु पाठिस लागे;
कलामागुनी कला भक्षणा मागे !
        सुरलोकांचें साधाया कल्याण—
लचका तनुचा तिळतिळ दुःखद भोगें ! !

स्थण्डिलावरी अर्पी कर्तव्याच्या
आहुति धैर्यें अपुल्या सकल कलांच्या;
        जाणीवकळा कर्तव्याची येतां
चिदानन्द विहरतो समाधानाचा ! ७६

* *

चान्द्रमसी मी सुधा आहुतोर्वरित
म्हणुनी हंसतें निरुपमशा हर्षांत !
        अबाधित सदा दण्डक नैसर्गिक हा—
‘ सौन्दर्याचा असे त्यागमय अन्त ! ’

अितुकें बोलुनि पावे अन्तर्धाना;
लव स्पर्शितो विषाद अंतःकरणा !
        आकर्षुनि परि सुगन्धयुत लहरींनीं
पवन वेधितो तोंच प्रियेच्या भाना ! !

'गुलाब!' मधुरामोदाचें हें सद्म
किती दरवळें; भरुनी टाकी व्योम!
 उठली; गेली समीप; हळुहळुं झुलवी!
सौन्दर्याचें सहज सुगन्धीं प्रेम!!

स्पर्धा खेळे रक्तिमेंत गालाशीं—
मत्कान्तेच्या सौन्दर्यनिधानाशीं;
 आणि सुगन्धीं? मातच मारी येथें!
कस्तुरिशीं! हो! सुगन्धसम्राज्ञीशीं!!

समीर गातां डोलत धरितो ताल;
राघु बोलतां जसें नाचतें बाल!
 परी खालतीं कठोर कण्टकमय हा—
चुन्याखडीचा पायीं ताजमहाल!!

नवीनशा सुकुमार डिरीवर खेळे;
बालसुलभ नानाविध माण्डी चाळे;
 नवप्रसूतायुवतीच्या अङ्कींचें
स्निग्ध मनोहर कुणि हें बाल चळवळे?

अर्धोन्मीलित गुलाबसुम देखून,
श्रवणपिपासू ध्यान बसे देअून!
 फुले पांकळी—सुमनाचा अधर हले,
अधीर हो दाविण्या हृदय अुघडून!! १०४

* *

" कथितों तुजला आतां अेक कहाणी—
जधीं स्वतन्त्रा सुभगा होती अवनी!
 झेली मजला अप्सरःकरभ्रष्ट,
स्थापी हृदयीं प्रकृतिकोमला राणी!!

श्यामलकण्ठीं रुचिर रत्नमय माला—
मधें स्थापिली कौस्तुभसम मत्तनुला;
  रजनीकण्ठीं तारकमाला रुळते
कीं स्थापुनियां मध्यें भिन्दुकलेला !

विलासिनी ती जधीं करी विभ्रमण;
तियेसवें मत्काया करि उत्पतन;
  गमे पावतां हर्दी पुन्हां विश्रान्ति
मखमाल जणूं ठेवियली पसरून !

करीं धरोनी हास्यमुखें मज पाही
ये हर्षाचा तधीं अुमाळा हृदयीं;
  अुषा रङ्गतां मधुकर अरविन्दाच्या
अर्धफुल्ल कलिकेंत अधीरच होअी;

तों अेकदिनीं दुःखद वार्ता आली—
अखिला सेना रणाङ्गणीं मृत झाली !
  अन् तन्नाथहि, हाय, सङ्गरीं पडले
दैवहि अुलटें होतें सङ्कटकालीं !

लीलाकमला त्यागुनि खड्गा झेली;
भ्रूचापधरा सज्जधनुर्धर झाली !
  गालाअैवजिं ढाल रोधिते बाणां
विलासरमणी वीरा रमणी बनली !

परजी हस्तीं कन्दट तलवारीस
कन्दुकसम अरिमुण्डा अुडवायास !
  चौरङ्गी सामन्यांत समराङ्गणिंच्या—
चेण्डुफळीचा डाव चढे रङ्गास ! !

सन्देश !

बाणांचा रव ' सूं ' आकाशीं भिनला !
तलवारींचा लखलखाट चमचमला !
समरक्षेत्रीं जाहली धुमश्चक्री;
तों तद्वाञ्छित पाते मङ्गलवेला !

'सूं सूं'—शर शत्रूचा येओी रोखें
हृदयाच्या राणीच्या; मत्तनु कम्पे ! !
ढालीवर हृदयाच्या झेलुनि त्यास
तीस रक्षण्या सज्ज जहालों तेखें ! !

भेदुनियां मन्मृदुहृदयाला पार
जाओी जें चाखण्यास तद्हृद्रुधिर,
होओी हाहाकार रणीं अतिकरुण
स्वातन्त्र्यरणीं लढतां झाली अमर !

क्षणभर विलसे शान्ति-समाधान मुखीं,
पाही मजला डोळे भरुनी सुमुखी ! !
अन् ठेवित जडदेहा भूवर वदते—
' आलें, नाथा ! न करा हाकाहाकी ! ! '

रक्तिमा तिच्या त्यागपूर्ण रक्ताचा;
गन्ध हृदींच्या अखण्ड प्रेमौघाचा !
तशीच माझी प्रभा मनोहर रूपा
असे लव तिच्या चैतन्यज्योतीचा ! !

स्वातन्त्र्यप्रिय पतीकारणें लढत,
मृत्युवरी ती अघोर सङ्ग्रामांत !
आणि तिच्याकारणें अर्पिली तनु मीं !
स्वार्थ त्यागुनि परहित जीवनहेत ! !

पाहुनी तुला होअि तिची आठवण !
करी मला तूं तिच्यासारखें जतन;
        प्रसङ्ग येतां तुजवरती दुःखाचा—
पाहि मजकडे आणि टाक तें गिळुन !"

वदुनि असें जें मृदुल कुसुम हो स्तब्ध;
तोंच समाधी अुतरुनि शान्ता क्षुब्ध
        पाहि पुढें तों, मन्दानिल-लहरींत
डुलत दावि तें निर्विकार आनन्द.

द्विधा विचारीं भ्रमे मन तिचें क्लान्त—
सरिज्जलीं भिरभिरे मत्स्य भंवऱ्यांत !
        तेंवि अनिश्चित, सूचित सङ्कट बघुनी
"खुडावें ? न कीं...?" विचार करितां भ्रान्त !

"खुडावें—तरी कोमल कोमेजेल—
आणि खुडावें वदतां असले बोल ?
        नहि ! नहि !..." तरिही दुज्या पलीं मन बदले
आठवतां पुष्पाचे शब्द अमोल !

"अन् जरि होअी सत्य विपत् सूचित ती
ह्या पुष्पानें..." धडड धडधडे छाती !
        आणिक पसरे वदनावरती चिन्ता
खळें जसें निस्तेज शशिमुखाभंवतीं ! !

जाणुनि हा क्षण योग्य पुढें सरकाया
मी हळुं हललों पार्श्वबाजुला जाया !
        लागुन चाहुल नयन फिरवितां दिसते—
तुटती उल्का ! अन् मम अन्धुक काया ! !

सन्देश !

स्तम्भित पळभर, अुठे धीर धरुनीयां,
मन्दमन्द ये मत्सन्निध निरखाया;
    ओळखितां, धरि हातें कापरी अधिरी...
आणिक बघते नयनिं काय शोधाया ?

परि नच अुमटे मुखांतुनी मुळिं बोल;
वेडिपिशी पाहते मुखास अबोल !
    अन् दुसऱ्या पळिं धरुनि करीं मम वदना—
टेकि कपाळीं दिनवाणी स्वकपाल ! !

वर्षी अश्रू;—अकाल वर्षा जैसी
रिता होअितों घन, भिजवी सृष्टीसी ! !
    अन् मग होई सन्थ;—समुद्रीं नौका
नीर अुपसतां जशी तरङ्गे, तैसी ! ! १९२

२

मन्त्रणा

*मन्द मन्द वायु वहे परममोहक,
गन्ध मधुर दरवळतो कुञ्जसुमांचा,
रजनी पसरे प्रशान्त आणि नादतो
धीरशब्द दुम् दुमसा सागरहृदयीं—
परि माझ्या हृदयींच्या क्षुब्धसमुद्रीं
प्रलयोर्मी धडकति अन् खडक भाङ्गती
घुसताती वेळेच्या आंत; कारण
अशी ही विकल सखी भीता हरिणी ! !
केंवी तिज साङ्गूं मम पूर्ण निश्चय ?
अन् कैसी मिळवुं तिची स्नेहसम्मति ?

धरिते मम कर हृदयीं दाबुन; सोडी
अुच्छ्वासा मन्द, परि बोल न बोले !
जाणियलें, केंवि करी तो "सन्देश"

* जाति : वैनायक (धवलचान्द्रिका)

संवेदनजनित तिची पूर्वसिद्धता
अैकाया, सूचित जें प्रथम तें स्फुट
माझ्या शब्दांतुन; ती कर्तव्याज्ञा,
तत्त्वपालनार्थ वा अवश्य ती कृति,
अथवा तो हविर्भाग म्यां द्यायाचा
धगधगत्या सर्वभक्षि हवनाग्नींत. २११

आजदिनावेरीं तीं कमलकोमला
प्रियतम मत्प्रेयसीच सतत निर्झर
होती मम अुत्साहा; वादविवादीं
अतिनिपुणा मम रमणी, पटु संवादीं,

कलावन्त, रसिका अन् परमतीक्ष्णधी
तर्कशुद्ध बुद्धिवाद करि; परी खरी
प्रागतिका; संवर्धित बाल्यि सुखांत;
नच शङ्की प्रौढावस्थेंत विपत्ती
(—जरि न विपत्ती मजला, तिजसि निश्चित !)
ओढवेल आकस्मिक !...होअिल का ही
सुकुमारा अैकतांच वज्रकठोरा ?
धैर्याचा मम अखण्ड ओघ; जशी ती
काव्याचा जीवनांत ? जीवनान्तही
मम सोशिल का ती त्या समवृत्तीनें ??

मीहि स्तब्ध चिन्तनांत, आणि स्तब्ध ती,
स्तब्ध बाग, स्तब्ध खोल अम्बर, मात्र
नाद घुमे क्षितिजान्तरिं नीरोर्मींचा;
तों करिते ‘टिट् टिट्’ टिटवी भरारत
जाते अति दूर, तधीं नाद तिचा तो
विरत विरत गम्भीरवि वातावरणा.

तें कर्णीं पुशिलें मीं हळुंच "प्रियसखी !
कां अबोल ? साङ्ग मला कारण !..." परि ती
टेकी मस्तक पुनरपि हृदयावरती,
अुघडुनि हळुं नेत्र, पुन्हां मिटुनी बोले :
"तोडियली कक्षेंतुनि तारका ग्रहें
प्रिय, न देखिली ?..." नि पुन्हां स्तब्ध होतसे;
अनिर्वाच्य अन्तर्गत गूढ वेदना
मूक करी मम बुल्बुल मधुर बोलका. २३९

(म्हणुनी नच काव्यमयी अुपपत्ति तिच्या
अपशकुनी शङ्केची तिजसि सुचविली
कीं, न तुटे तारा ती विमलाकाशीं;
तो चमके दृष्टिपात परावर्तित
नील खोल अम्बरांत चमकुनी जधीं
देखिलेस मज. तेव्हां केंवि कथावें ?
कैसा अुत्साह यावा ? होअिल का त्या
ध्रुवप्रान्तसंशोधक नौकापतिला
—कितिहि जरी अुत्सुक तो पाहुन घ्याया
रम्य अुषा व्यजनाकृति भव्योदात्त—
महानन्द, जैं गवसे हिमगिरीतळीं
अन् जीवन नसतांना शाश्वतीमधें ?)

म्हणुनि सरळ सम्बोधुन तिज वदलों मी;
"आलों मी, सखि ! करण्या तुजसि मन्त्रणा;
तव विचारभावांना समजुनि घ्याया
अेक महा प्रभावरि !...अन् तूं अैशी
गूढ, खिन्न, वचनहीन कां न बोलशी ?"

" महविचारभाव ?...खरें सांगूं ?...रमणी
सर्व मृदुल तत्त्वांची अेक मूर्तिशी,
मेणाची जणुं पुतळी वा लोण्याची
रखमाअी मूर्तिमती ! ! भूमिका तिची
जीवनांत अेवढि, कीं पतिकार्यांत
जेथ कृती, कर्तव्यें, प्राणदान वा
आवश्यक—अडवणूक तेथें करणें
घाबरुनी, प्रगतिपथीं पति जातांना
गतिनिरोध प्रतिगामी करणेंच अशी ! !
मग कसली मन्त्रणा नि भावना मम
अुपयोगी होय तुला, प्रिय, खरोखर ! ! " २६७

श्रवुनी हें वच विषण्ण मी अुत्तरलों,
" नित्यरूप जीवनांत प्रीति-भक्ति अन्
करुणा हीं सतत राहणेंच अवश्य !
अैशा या नित्यरूप जीवनकार्यीं
मूलभूतकार्य करी ललना, नर ते
नैमित्तिक कार्यी आकण्ठ बुडुनियां
विस्मरती भव्योज्ज्वल अत्युदार ती
गङ्गोत्री क्षान्ति-शान्ति-सन्तोषमयी
हृदयींची रमणीच्या दिव्य पवित्र ! !
हें झालें अेक सत्य; आणिक सांगूं... ?
कोण अधिक जाणतसे गुणदोषांसी
पुरुषाच्या, आणिक तच्छक्ति अनेक,
तितुकी, जितुकी सहानुभूत प्रेयसी

जाणितसे ? " " सत्य तुझें वच; परि, प्रिया !—"
वादनिपुण मूळरूप बोलतें अतां—
" तत्त्वांस्तव झगडति ना पुरुष ? मग तयां

अनवश्यच हें सारें निष्कामांना ?..."
" तत्त्वांस्तव निश्चित ते करिती झगडे !
परि त्यांच्या तत्त्वां जन साधारण ते
हेटाळती, नुमजुनि तीं गम्भीर किती,
शाश्वत किति, आणिक निज तत्त्वीं त्यांची
किति अभङ्ग भक्ती; मग ओकलकोण्डे
तत्त्वांच्या कण्टकमयमार्गिं प्रवासी
धुण्डळती कीं, कुणितरि व्यक्ति जगतिं या
जाणत कीं खरि अपुली योग्यता ? तश
प्रेममयी मूर्ति अुभी चक्षुंसमोर
कोणाची अचलनेत्र ?...म्हणुनियां, सखे !
त्वद्विचार अैकाया अुत्सुक झालों ! !"

यावरती प्रत्युत्तर ना दिलें; पुन्हां
ती विषण्ण होत; शान्त बनत पळभर,
आणिक निज कम्पित वच खिन्ना बोले :

" वनलक्ष्मी रम्य रम्य सृष्टि पांघरी
वरुनि प्रिय ! परि हृदयीं ?...धरणीकम्प
चालति; तैं लाव्हाचे बसती चटके;
अन् जाते भेदरुनी; तैं पृथ्वीचे
नगपुङ्गव दुर्भङ्गति तुङ्ग पलांत,
अन् विनाश मात्र विकटहास्य खिदळवी ! !
...धडधडतें हृदय किती अैक; ...ही तुझी
'शान्ता' हृदिं कम्पित कां ?... आज देखिलें
जागृतींत स्वप्न; कधीं वदत शशिकला ?
ती वदली आज !—वदे हा गुलाब कीं
मनुजवचीं ? परि तोही आज बोलला—
शुभ किंवा अशुभ मी न जाणतें; परि

निश्चित तें द्योतकसे आपातांचे
भावी... ती आपत्, प्रिय...” आणि सङ्कुला

शहारून नेत्र मिटी, स्तब्ध झणिं बने,
आणिक मग पूर्ण शान्त होतसे,—जशी
बिजलीची चमक लागतांच किञ्चित्
झणझणते सर्व तनू, अणुरेणूंत
सणसणते वीज, आणि मग जातां ती
विरुनीयां वृत्ति बने; तेंवी शान्ता
साङ्गे वृत्तान्त सर्व, दाखवी सुमा,
आणि शेवटीं वदते : “ प्रिय, जरी खरें
तात्त्विक तव चिन्तन; तरि चिन्ता वाटे
कैंवी त्वत्कार्य राष्ट्रमोचनात्मक
अप्रतिहत सफलहेतु होअि, न येतां
तुजवरती सङ्कट, अडचण नि अडथळे...” ३२४

भीति तिची सार्थ असे, स्नेहसहज ती;
परि तिजला पर्यायें अुत्तर दिधलें :
“ घनतिमिराक्रान्त जधीं विश्वजननिला
करायास मुक्त, सखी ! चन्द्र प्रयते,
जें थबके क्षणिं, दुसऱ्या मार्ग आक्रमी,
वळुनि क्षण तीक्ष्ण दृष्टि फेंकि चहुंकडे;
तैं पुढतीं अुदयाचल ‘आ’ वासुनियां
गिळण्याला वीराला सिद्ध ठाकतो
परि येतो निःसङ्कट अम्बरशिखरीं
लाम्बरुन्द मेघांच्या चढुन पायऱ्या;
‘ हा प्रियकर ! चढ, चढ, चढ; तिथुं नको वा ! !
दुष्ट नष्ट पापी तुज टपति धराया...’
या अधीर शब्दांनीं प्रार्थी पूर्वा

परि तिकडे त्यास हंसे कोण तमांत ?
‘ मूढ चन्द्र चढतो हा अचल कासया
फुकट मरायास ! ’... असें बोलबोलुनी !
रातकिडे कुजबुजती—मूर्ख ठरविती,
घुबडेंही दोष देत दांत चावुनी;
परि रविनें क्षुद्र अशा वीर कां अडे ?
तो चढतो भर भर भर मातृसमीप...
“ सर्पांनीं प्रिय माता गांजिली, असें
पाहुनियां वीर विनायक निघे रणा;
हरुनि जधीं दिव्य सुधा मोचिलें तिला
काय तधीं सङ्कट त्या गरुडा नव्हतें ?
अुच्च भव्य गृह; सभोंवतीं पुन्हां अुभे
सायुध अन् सावधान रक्षक; तेथें
सुधापात्र ठेवियलें अज्ञातपणें
देवांनीं लपवुनि सर्वोच्चतलांत;
परि हा जैं गरुड चढे गृह क्षणामधें,
वातायनिं आंत शिरे, हरि सुधा मधु,
कोण तया भिवविण्या समर्थ जाहले ? ”

“ आणि यदा घेतियली झेप वानरें
लङ्केवरि सीतेच्या शुद्धिकारणें,
शिरला निर्भीक वासल्या मुखामधें
राक्षसिच्या; कोणि तदा भिवविलें तया ?
म्हणुनि, सखे, भीति नसे जैं जन करिती
भव्य तत्त्वजन्य कार्य, अर्पुनी तनु ! ”

गोड झुळुक वाऱ्याची थण्डगारशी
वाहून ने क्षुब्धतेस आणि करितसे
वातावरणा हलकें, डुलवितें कसें

तें गुलाबपुष्प, निळ्या पार्श्वभूवरीं
हृदयङ्गम छायाकृति निर्मिली तयें.
उठली शान्ता त्वरेंत, जाअि फुलाशीं,
आणि तिची छायामय पुसट आकृति
खुलवितसे त्या दृश्या—कीं, अरुन्धती
झुन्जुमुन्जु उठुनी या उत्तरध्रुवीं,
हिमसीत्कारांत जणूं नाहत जाते
वेंचाया तरल उषापद्म; सिद्धता
करिते सप्तर्षि तपःसाधना सती,
ती जेंवी विषुवाहुन अस्फुट दिसते,
तेंवी दिसते शान्ता, निरखिते क्षण,
अन् खुडिते तो गुलाब; हळुं मग वळते
मत्सन्निध, ये समोर, ओणवी बने,
अन् अर्पी, अश्रुसवें, पुष्प तें मला.
“ कार्यास्तव जात तुम्ही; आठवण तिथें
ही माझी प्रिय...” अितुकें सद्गदित वदे
अेक निमिष; परि शान्ती किति विलक्षण
पसरत त्या बागेवर ! मग गृहाप्रति
जातां, किति मिश्र भाव, मिश्र विचार
मानसांत चमकुनियां गेले; जैसे
अम्बरांत तारकगण विविध तरळती
असम्बद्ध-अगणित ! परि तेज तयांचें
कुतुकास्पद; तैशी मम वृत्ति जाहली,
कारण कीं प्रिय सखिनें अनुमती दिली,
पुष्परूप शक्ति दिली, आणि दाविली
भारतयुवतीसहजा त्यागवृत्ति ती !

३ बन्दिवास

*अन् हांकेला अुतरुनि रणा राष्ट्रभूभक्तिरङ्गा,
मीही योद्धा बनुन शिबिरीं जात निर्बन्धभङ्गा;
निःशस्त्रांची रणकुशलता आत्मसामर्थ्यनिष्ठ
होती तेव्हां करित जगतीं स्वप्रयोगा विशिष्ट.

प्राजक्तीचा बहरत जधीं वृक्ष वर्षाऋतूंत,
मोत्यांसी जें बरसत असे मेघ मल्हारतृप्त,
गौराङ्गीनें सुमन-चिति तें गौरिपादीं वहावी,
स्वातन्त्र्यश्रीपदिं युवसुमां भारती अर्पि तेंवी !

स्वातन्त्र्याचा धुमसत तदा सागरीं वाडवाग्नी,
तो दावाग्नी भडकत जळे गर्द रानीं अरण्यीं,
—त्या त्या हातीं जळति ठिणग्या, भग्ननिर्बन्ध मीठ,
—त्या त्या शाखा वसति करिं या, रान सत्याग्रहांत.

* वृत्त : मन्दाक्रान्ता

मीही माझ्या शिबिरिं बनलों सर्वसत्ताधिकारी;
स्वातन्त्र्याची तळमळ जगीं सर्व सत्तेस भारी !
केला सत्याग्रह म्हणुन मीं; जाहलों बन्दिवान
न्यायाच्या त्या प्रहसनिं मुळीं घेतला भाग मीं न !

दो वर्षांचा श्रमसह मिळे पाहुणेचार, कारा;
दो वर्षांचा विरह सहणें स्नेह सोडून सारा !
दो वर्षांचा विरह, परि तो त्या क्षणीं 'सान' भासे—
शान्ता जेव्हां परत वळतां धीर तें हास्य हांसे ! !

शान्ता जाते परत—! चमके तों स्मृती तीव्रवेगें
"शान्ता, राही क्षण अुभि-" वदें मी, नि हस्तीं करां घे;
"ठेवी ही तूं जपून, सुहृदे, ठेव...ही मङ्गलेच्छा—"
—प्रीतीसङ्गें धरिं करिं गुलाबाचिया स्नेहगुच्छा !

धीरा शान्ता करि मजकडे विस्मितालोकनाला;
अैशी पाही क्षण, मग बघे त्या प्रतीका-सुमाला !
तन्नेत्रींच्या स्फटिकतरला गूढगङ्गोत्रिदेशीं
सम्मिश्रोर्मी अुमटवि किती भिन्नवर्णच्छटांसी ! ४१८

गेली शान्ता...! परत कधिं ती भेट...? तीं दोन वर्षें
कारावासीं, मग...! ! परि करीं वासना दूर रोषें !
आसक्तीशीं झगडत करीं मी अनासक्तियोग,
तों आसक्ती प्रबलच करी रम्य ते काम्यभोग !

झालों मुद्राङ्कित मग तिथें बन्दि कारागृहांत,
कारावेषीं सजुन बसलों त्या क्रमाङ्कासमेत !
लागे:'नारायण' अडकतां गर्दभाच्या पदाला
साधा कैसा 'नर' मग सहे मर्कटांच्या न लीला ?

होत्या तेथें विविध प्रकृती मानवी मानसाच्या,
तेंवी होत्या विविध विकृती पाशवी कामनांच्या;
... मीही झालों समरस पुरा त्यांचिया सङ्गतींत
छोटा-मोठा विरत सगळा भेद त्या रौरवांत !

ज्यांची "मोठे" समजुन जनीं आरती भव्य केली,
त्यांची कारागृहिंहि चलते ती "अ" वर्गीय "केली"
अन् ज्या आम्ही अहह ! गणिले जन्तुसे हीन-दीन
ते श्रीमन्ती हृदयज किती दाविती भावपूर्ण !

अैशी विस्मायक अुभि दुजी सृष्टि दृष्टीसमोर;
दृश्यें दावी किति तरळ ती अन् भ्रमां नेत दूर !
नीति-न्यायीं यमनियम, तीं पुस्तकी धर्म्य कर्मे
सारीं येथें अुलटति, खरीं दाविती मूळ वर्मे !

गेली माझी समज—किं तयां हीन लोकां न नेकी !
आली आतां अुमज—न अम्ही अेकटे शिष्ट लोकीं !
या कारेच्या नरकिंहि तरे श्रेष्ठ मानव्य भव्य—
कीं आमेच्या तिमिरिं तुटती तारका दीप्त नव्य !

ब्रह्मर्षी जे बनति सकलज्ञानविज्ञानवन्त—
कान्तारीं ते वसति, तरिही जाणती लोकतन्त्र !
तेंवी जाणें 'विकृत' मन मी तेंवि मानव्य 'सत्य'
कारावासीं पिचत करितों जें निरीक्षेस नित्य !

चर्चा चाले विविध विषयीं लावुनी भिन्न कोन
हिंसाऽहिंसा, असह-प्रति अन् शस्त्रयोगांवरून;
स्त्रीस्वातन्त्र्यीं, नि जड-समतावाद, आस्तिक्यवादीं
साहे कष्टा तनु, परि रमे बुद्धि नाना विवादीं !

कारावासीं क्रम सतत हा; तेथ ना स्वैर वारें;
होतों आम्ही जगत विजनीं जीवना अेकसूरें;
मण्डूकांसी विपिनिं डबकें (जीर्ण, कण्टाळवाणें)
वाटे मोठें परि करिति ते ड्रॉंव्-डरांव् अुत्सहानें !

त्या जीवांसी पण क्वचित ये सम्भ्रमाचा प्रसङ्ग,
कोणी हौशी करि जधिं तिथें भोजनासी खमङ्ग !
तेंवी येथें खळबळ अुडे जैं नवे बन्दि येती,
जो तो होतो अधिर कळण्या गुर्ढिंच्या रम्य गोष्टी !

हर्षस्पर्शे खुलति कळतां कीं, सुरू युद्ध घोर,
नाहीं मोठ्या नगरिंच, परी गांवगांवीं सुदूर;
अन् आनन्दी बहु समजतां कीं, पुरन्ध्री-कुमारी
लाठीमारा सहिति, करिती बन्दिशाळेंत वारी ! ४६२

तों ये वेळा मधुर, सकलां बन्दिनीं प्रार्थिता ती
आनन्दी तो दिवस अुगवे, ज्या दिनीं पत्र-भेटी;
अुत्कण्ठेनें प्रतिजन बघे वाट आमन्त्रणाची—
वा पत्राची कुणिकडुनच्या ?—रक्तरेखाङ्किताची ! !

मीही साधारण जन तसा बन्दिलोकांमधील
अत्युत्कण्ठा हृदयिं, न सुचे काम जात्यावरील;
कोलूदाण्डा कुरकुर करी अन्दमानीं—न वीर !
ठेवी वृत्ती सम कवि तदा !—अन् रची काव्य थोर... !

कम्पे हंसी जलजदलिं, तों मानसीं कम्पमाला,
वृत्ती तेंवी हार्दिं अुमटवी भावुक स्पन्दनाला;
'येअी शान्ता प्रियसखि— ?' मनीं लागली ओढ गूढ
'येअी कान्ता न जरि तरि तत्पत्र काव्यात्म गोड— ?'

नाहीं आली !...परि मज मिळे पत्र तीच्या करींचें;
होतें का तें रसमधुर नी दीर्घ त्या प्रेमलेचें ?
होतें ना तें प्रणयि, तरिही स्नेह होता भरून,
सारें होतें तुटक, तरि तें गूढ तत्त्वार्थ पूर्ण !

ऐसें भासे द्विविध मजला—'साश' आणी 'निराश'!
सन्तोषा दे मतिस, करितें अन्तरासी अुदास !
अिष्टा वार्ता, परि हृदयिं का वाटते ती अनिष्ट ?
मी योद्धा तो अचल, अथवा कोणि दीन भ्रमिष्ट ?

पत्रीं बोले :
"प्रिय,
तव अशी ध्येयभक्ती बघून
वाटूं लागे, सहचरि तुला योग्य व्हावें म्हणून,
त्यागूनी हें सुख, तुजविना दुःखसें भासतें जें,
व्हावें अुल्का क्षण चमकुनी त्या ग्रहायोग्य तेजें !

आशीर्वादा मजसि, प्रिय दे, कीं जयें धीर येअी
अन् कर्तव्या निज विपदिंही मी न सोडून जाअीं.

तूझी,
कान्ता,"

—(परि मग लिही वाक्य हें 'लेखनान्ता')
"वाटे चिन्ता प्रकृतिविषयीं तूझिया मात्र !

—शान्ता."

चिन्ता वाटे प्रकृतिविषयीं माझिया—आणि, शान्ते !
चिन्ता कां ना प्रकृतिविषयीं आपुल्या ?...साङ्ग कीं तें ?
पाषाणाची प्रकृति मग ही वांचुनी काय अर्थ ?
—अन् पुष्पाची प्रकृति तव ती कोमजूनीच सार्थ !

शैलेन्द्राचें सुभग सजवी शृङ्ग सन्ध्या सुवर्णा—
अेक्या पार्श्वीं; परि अह ! दुज्या काळरात्री कभिन्ना !
—किंवा कण्ठस्थित खवलयें अिन्दुचें बिम्ब साजे
जें कीं मेघें परि फिकटुनी काळवण्डे अतेजें !

तेंवी चाले तशि मम मनीं-जीवनीं द्वन्द्व तीक्ष्ण
ध्येयाकाङ्क्षी मन 'अुमलतें,' भावसम्बद्ध...'खिन्न' !
ध्येयासाठीं झगडत जसें जन्मसाफल्य साध्य
त्याच्यासाठीं विफल बळि हो जीव यज्ञीय वध्य !

वृत्ती अैशी विकल जधिं मीं उत्तरा पाठवीलें,
नाहीं पूर्णा अनुमति, न वा मीं विरोधास केलें;
...कार्यासाठीं कठिण धरिला मार्ग जो तोच डङ्खी
'शान्ता' कष्टे म्हणुन ! !—हळवें प्रेम हें प्रेमिदुःखीं !

" शान्ते, सौख्यीं सम जरि तरी दुःखकार्यींच कां न ?
या तत्वानें अनुमति पुरी यायची मोदपूर्ण...!
होते आहे परि विचल ही वृत्ति, गे, भावभूकी !
...किंवा कम्पे हृदयिंच अतिस्नेह हा पापशङ्की ?

" जो विज्ञानें गतिमय, असा मङ्गळा बाण लक्षी,
तो अज्ञानें परि परततो बावरा मूळदेशीं...
वैकुण्ठासी गमन करण्या आङ्गणीं ये विमान,
तें खुण्टासी बसुन दळणें धान्य 'जीजे'स मान्य !

" कार्यीं हो तूं रत;—परि, प्रिये, रूप त्याचें दुहेरी;
आधीं विध्वंसन, विरचना मागुनी देशकार्यीं !
जैशा वृत्ती द्विविध, तशि ही लोकिंची कार्यनीति,
साधी प्रेमप्रकृति 'रचना', 'ध्वंसना'—क्षोभवृत्ति.

“ ती तूं साधी शुभ विरचना ती तुझी कार्यकक्षा,
सन्तोषानें मन वळविणें जाणते मात्र योषा !
पाया खोदी नर, मिळवितो लांकडांना, खडीला
नारी देते परि विरचनें हृद्यता मन्दिराला !

“ साधाया ती जरुर रचना, प्रेमले, त्वां झटावें,
अन् सन्तोषा मनिं मिळवुनी कार्यतल्लीन व्हावें—
ही शुद्धेच्छा सतत मनिं जो बाळगी तो

तुझा मी,
स्नेहाकांक्षी,
विजय. ”
—तिचिया धाडिलें पत्र नामीं !

वेळोवेळीं पुढतिं मज ती कार्यवृत्तें निवेदी,
ग्रामोद्योगी, हरिजनगृहीं ने विकायास खादी !
गुरुयाभोंतीं सविनय करी ती निरोधा शुभाङ्गी—
कैसा आला अनुभव तिला त्या विचित्र प्रसङ्गीं—!

अेका पत्रीं लिहि :
“ विजय;
मीं काय वृत्तें लिहावीं...!
आकाशाला गवसणिच ही !...नोहती मात्र ठावी !
आरम्भाला किति तरि-तुला साङ्गुं-अुत्साह होता
पावे नाशा हळुंहळुं...करी क्षोभ निर्माण चित्ता !

“ स्त्री-सामर्थ्यीं, प्रिय, तव असे पूर्ण विश्वास-नाहीं ? ”
(मर्मस्पर्शी हळुंच मजसी टोमणा मात्र देअी !)
“ त्या शक्तीशीं परि नर कशी वापरी ! बाअि शर्थ !
स्त्रीशक्तीशीं शठ कपटि दे स्त्रीस योजून धूर्त !

" जो दे ज्ञानामृत बहुजनां दारुबन्दीसभेंत,
ठेकेदारा गुपचिप अुणा तोच सव्याज देत !
ते पेण्दारी !—मिरविति परी ते पुढारी समाजीं
दारूवाला रतिब पुरवी ठेविण्या त्यांस राजी !

" पोळ्यामध्यें मिळवित मधा आयती माशिराणी,
वेश्या तेंवी फसवित जनां मञ्जुळा नाम कोणी;
आस्कन्दी ती मदिरनयना मत्त त्या मद्यप्यांस
जें मी त्यांना विनवित हळूं मद्य सोडावयास !

" निर्मूनी ती सुरस मदिरा, मोहिनी रक्षि देवां,
देअूनी ही विरस मदिरा भोगिनी भक्षि सर्वां !
' दारू सोडा '—हितवच कटू हें रुचे का कुणास ?
' दारू जोडा '—म्हणुन विनवी कामिनी जैं सहास !

" अैसी आहे स्थिति अिकडची !—कां न वाटे निराशा ?
कर्तृत्वाचा विजय अमुचा ?—लोक मानी तमाशा !
शान्ती, प्रीति, मृदुसरलता, तें सहिष्णुत्व थोर
साक्षेपत्वें विफल ठरलीं त्या पशुत्वासमोर...! ११४

" जाअूं या तें, प्रिय, प्रकृतिची काळजी वाटतेच !
कैसी आहे ? कळव, जपुनी वागणें,

मी तुझीच,

शान्ता."

—चिन्ता करिशि अजुनी ! पात्रता काय माझी ?
विश्वोद्धारा झटुन करिशी !—थोरवी ही स्त्रियांची ! !

कारावासीं हळुहळुं असा मी स्थिरावें, न दुःख;
तोंची झाला अवचित कसा घाव मर्मी अचूक !
शान्ता ! हाः रे ! विकल पडली मृत्युच्या आन्थरूणीं
राही सारा अडकुनि तिचा जीव माझ्या ठिकाणीं !

कान्ते, रात्रन्दिन न थकतां तूं प्रचारार्थ जाशी,
थण्डी-वारा गणिसि न, नसे काळजी पाअुसाची !
दिव्योत्साहा जरि न पडती भङ्ग या कारणानें
मर्त्या देहा परि जखडती व्याधि त्या आकसानें.

जैसा वैरी भर मुदतिचा ताप दे नित्य मूला,
तैसा घेरी ज्वर मुदतिचा घातकी मत्प्रियेला !
शान्ता होते पिचुन मरणासन्न—तैं अेक आस,
भेटायासी मज बघतसे जीव वाटेकडेस !

होती थोडी मुदत अुरली बन्दिवासामधील;
मीही पाळी नियमित सदा दण्डकां बन्दितील,
बाहेरूनी बहुत सुहृदें यत्न केला, म्हणून
भेटायासी तिजसि मजला ये अनुज्ञा लिहून !

मन्त्री कोणी भुजग धरुनी सोडितां मन्त्रमुग्ध,
जातो कैसा सरर... निमिषीं वारुळीं स्नेहबद्ध !
होअी का त्या सुख जधिं कळे त्यास —'आर्ता भुजंगी—
'—कोणी शत्रू विकळ करितो तीस ठेचून आङ्गीं' !

तेंवी, व्हावा मजसि कसला हर्ष त्या मुक्तिमध्यें !
शान्ते ! शान्ते ! ! अहह ! कशि गे ही दशा ये सुबुद्धे !
माता जातां, प्रिय, तुजमुळें पोरका जाहलों न,
ती तूं जातां खचित अुघडा मी पडे प्रेमहीन !

होती शुद्धी, शयनिं जधिं मीं देखिली पुण्यशीला
शान्ती नेत्रीं अचल, वरिते गूढशा भावनेला;
पाही, अन् ‘या’ खुणवुन म्हणे, वांकलों मी तियेशीं,
घेतें हातीं निज —किति, अरे! क्षीण तो— मत्करासी!

“आलासी, हं विजय? प्रकृती कैंवि?... हो मोकळीक?
हें घे...” अैसें म्हणुन करिं दे तें गुलाबी प्रतीक!
ठेवी हाता निज अुरिं...! मला हुन्दका आवरे न...
...हा, रे, दैवा..., मजसि न अुरे भान, मी शक्तिहीन!

४

दर्शन

[१]

* ही अवसेची पसरे रात्र भयाण
भुवनास करी काळेंकुट्ट तमानें
बघ दाहि दिशा सुन्न होअुनी गेल्या—
जें हृदयींची विरलीं तेजःकिरणें !

त्या अनन्तशा खोल नील आभाळीं
घिरट्या घाली घन तिमिराचा मेघ;
त्यामागुनियां अस्फुट दिसतें कांहीं—
कीं मालवत्या तारांचा अुद्वेग ?

मम जीवनही घेरियलें अवसेनें,
ना तेजाचा लेश दिसे दृष्टीस,
वादळ सुटतां, नभ गिळतां अन्धारें
ध्रुव-तारेची खूण न नावाड्यास.

* जाति : जगदीश्वरबाला

आकाङ्क्षांचा विझे तारकापुञ्ज
भवितव्याच्या वातहीन गर्तेत !
जैं विरत असे शोकगीत हंसाचें
हेमन्ताच्या करुणान्तिक कहरांत !

वनराजींनीं शोभिवन्त गिरिमाला
काळोखाच्या टोळधाडिनें गिळिली :
मधु अमृताची धार कुणा राहुनें
फुसलावोनी गट्ट करुनि टाकियली !

तत्कण्ठि परी अस्फुट रेषा अुमटे—
अुमटे तेंवी पुसट रेघ दिक्प्रान्तीं;
ओहट वळतां सागर जातां खालीं
जशुं फेसाची रेघ किनाऱ्यावरती;

मम सत्कृतिची रम्य सुभग सुममाला
अन्धूक दिसे काळवण्डुनी जातां—
त्या "भूता"च्या अगम्य विस्तारांत
विस्मरणाची दारुण पटलें पडतां ! ६१८

मी अेकाकी भटकें रानोमाळ
तिज शोधाया "लपण्डाव" करतांना
परि काळोखें जागा नच ठेवियली,
मज शोधाया किंवा तिजला लपण्या !

मी भेदरतां सुटतां कम्प अपार,
तूं येशिल गे, द्याया धीरा मजला
म्हणुनी गेलों भयाण मसणवटींत
ना परि वाचा अेकाहि पिशाच्याला !

ती येअि अुषा   हंसत हंसत ? वा रक्ता ?
ना रङ्ग तिथें   हास्य न वा खुलवीते;
मज गमली ती   कारुण्याची मूर्ती
मच्चित्ताला   शमवायासी येते !

जो काळोख्या   कोठडींत अन्धाऱ्या
गेलों होतों   गाडियला निपचीत—
तो रविरूपी   सांपडलों आगीच्या
'आ' वासुनिया   धगधगत्या खाअींत !

तारुण्याची   करपुनि जाय नव्हाळी,
भुवनान्तरिची   हरुनी नेली शान्ती;
अति तापानें   भाजुन जात तनुलता
अन् आंसुसुधा   आंत सुकोनी जाती ! ६३८

[२]

*मग "दर्शन" जाहलें; तधीं
शशिकोरीवरि लोल बैसली;
विहरे ललितोत्सवीं प्रिया
जणुं नौकेवर खेलना करी.

अधरीं मृदु हास्य नाचवी
पसरे तों वसुधेवरी सुधा;
नच चन्द्रकला;—कलावती—
शमवी मुग्ध चकोर-संक्षुधा.

* वृत्त : वियोगिनी

हंसतां क्षण नेत्र कम्पवी
  तिथुनी ज्योति अुडून अम्बरीं
अुडुरूप धरी सकम्प ती,
  तरला हंसि जशी सरोवरीं !

अधिऱ्या नयनीं विलोकितां
  पडली दृष्टि सतेज तारकीं
दिपली परि सान्ज-चान्दणी
  दिसतां दीप्ति तिला प्रियामुखीं ?

करि "मङ्गळ" मङ्गला भला
  म्हणुनी सोत्सुक पाहिलें तिनें,
परि रोषभरांत जाळुनी
  खदिराङ्गार, बघे शुभानने !

अतिरोषभरांत ? तो कसा ?
  क्षणिं 'अङ्गारक' गार कां पडे ?
त्रयमूर्ति कठोर ती परी
  अनुसूयाकरिं बालशी रडे ! ६६२

अपकृष्ट तपें भगीरथें
  गगनीं जी नदती नदी वहे,
तव धीर गभीर दर्शनें
  सजली शान्तियुता सदुत्सहें !

चळतां परि अुत्तरेकडे
  विनता दृष्टि अतीव जाहली,
अतितीव्रतपा अुमा, परी
  विवहीं लोकसभेंत लाजली !

विनता काशि दृष्टि जाहली ?
    कळलें; त्या अृषिसप्तका बघे,
पडतां नयनीं अरुन्धती
    नत झाली; नच कांहिं वाअुगें !

विविधाकृति दृष्टि ही तुझी
    कधिं पूर्वीं नच पाहिली, सखे !
मग आजच काय देखण्या
    बहुरूपीं नटली, नटात्मके ?

परि अन्धुकशी छटा तिथें
    अुमटे त्या अवलोकनान्तरीं :
विरहीच अचूक ओळखी
    प्रणयी अुत्सुकता मुखावरी !

प्रिय ! अुत्सुक पाहसी कुणा ?
    प्रणयाभिज्ञ खुणा विलोकिसी ?
विषमाङ्ग सुरङ्ग मण्डपीं
    दमयन्ती निषधेश्वरा जशी ! ६८६

परि मीच विमूढ !...पाहते
    कसली ती, मजला-जरान्विता...
पिचलों अपकालवार्धकीं...
    तरि ‘ कामी ’ अवलोकितो ‘ स्व ’ता ! !

करि दृष्टिस दूर देवते !
    भिडतां ती मम दीन दृष्टिसी
अतिकारुणिके ! दयावती ! !
    त्यजुनी स्वर् वरिशील भूमिसी ! !

विमले ! मलहीन अम्बरीं,
    विहरो ती तव मूर्ति साजिरी;
जगतीं महती प्रभा स्फुरो
    तव चैतन्यवती विभाकरी !

" करणें करणीय "—ही जिनें
    मज कर्तव्यसुजागृती दिली
आजिं तीच निमग्न चिन्मयी
    ध्रुव-तारेसम विश्वमङ्गलीं ! !

प्रभुदर्शन सन्तजीवनीं
    चिरकालीं स्फुरवीत चेतना
प्रियदर्शन हें तुझें, प्रिये !
    मम जीवीं करि हर्षवर्षणा

सखि, जा, ...तव नौ तरे, पहा,
    सजवी स्वागतरङ्ग पश्चिमा;
लहरीलहरीवरी तरो,
    विहरो कीं गगनीं तिलोत्तमा !

* करुणभुवनगर्भी जानकी घे विसांवा;
    स्वसुतविषयपृष्ठा जाह्नवी होय लुप्त !
क्षणिं अकथित जाओ ऊर्वशी स्वर्गलोकीं,
    प्रियसखि मम तेंवी अन्तरालीं विराली ! ७१४

* वृत्त : मालिनी

५

जीवनयोग

*सुभव्यशा अम्बररङ्गभूवरीं
अपूर्व चाले कुणि नाट्यदर्शन;
अदृश्यरूपें तिथही करी कुणी
प्रवीण अत्यद्भुत सूत्रचालन !

अमूप नानाविध तेथ भूमिका
स्वसूत्रयोगें नटवी नटेश्वर;
असङ्ख्य ताराग्रह आपआपुलीं
नियुक्त कार्ये करिती परस्पर.

नितान्त वर्ते तिथ अेकवाक्यता
अनन्त नाचे जरि भूमिकागण
स्फुरत्कणांची रचि रम्य पार्श्वभू
सहस्ररश्मी—परि दृष्टिआडुन.

* वृत्त : वंशस्थ

असङ्ख्य अुल्का, तुटत्या, स्फुलिंगशा;
सपुच्छ तेजोनिधि धूमकेतुही;
नटानटाला अनुरूप हो अशी
प्रकाशशोभा रचिती हिरण्मयी ! !

खगोलकांचें सुविशाल अम्बरीं
सुरू असे नाटक आदिपासुन
न चक्रनेमिक्रम बन्द राहिला
कधींहि; चाले प्रतिवत्सरांतुन !

खरें—! न त्यांनीं निजकार्ययोजना
स्वयें नियोजून कृतींत आणिली !
स्वलीलया गोल निसर्गशक्तिनें
अबुद्ध ते खेळविले महाबली.

परी स्वकार्यांतरिं दाखवीत ते
अपूर्व अन्तर्गत जी व्यवस्थिति—
तिच्यापुढें "अुत्तम जीवयोनिची"
दिपूनियां लज्जित हो विसङ्गति ! ७४२

अचेतनीं ही जर भव्यता वसे,
न कां वसो ही तर चेतनामधीं ?
अभिन्नता दाविति भिन्नतेंत ते
न कां समानान्तरिं ती दिसो कधीं ?

तशीच जी हो रचनासुसङ्गति
कनिष्ठ योनींमधिं गौरवास्पद
न ती "सजीवांतिल अुत्तमांतही"
दिसून यावी...! किति लाञ्छनास्पद !

अभङ्ग त्यांची किति अेकवाक्यता
कितीहि ते क्षुद्र असोत गोलक !
अपूर्वशी भासत अेकरूपता
कितीहि ते सान दिसोत कीटक !

लुटावयाला मधुला वनोवन
भ्रमे सगुञ्जारव मक्षिकागण;
नि शोषुनीयां मधु बिन्दुबिन्दुही
श्रमूनियां सन्तत आणिती गृहीं

लहान मुङ्गी— परि अेकसारखी
विलीन कष्टांत अखण्ड सोनुली !
कणें कणें अन्न टिपून आणते
कुटुम्बरक्षार्थ झटून वारुळीं

जधीं गहूं माजुन पीक लोम्बतें,
तधीं किती हर्षत पांखुरें मनीं !
रचूनियां लाम्बच लाम्ब माळका
सुसज्ज होती निजभक्ष्यशोधनीं

थवे रचूनी जळिं मासळी वसे
परस्परांना जरि भक्षि ती सदा !
रचूनि टोळी बळि टोळधाड ये
जरी करी भक्षणें नाश सर्वदा !

विवेक यांच्यामधिं ना दिसे कधीं,
न बुद्धिसंयोजन कार्यकारणीं;
खरेंच—! त्यांचें जड सृष्टिसङ्गरीं
समूळ अस्तित्वहि नष्ट हो क्षणीं !

विवेक नाहीं, नहि बुद्धिचापल;
निसर्ग त्या मन्दमतीस चालवी;
तरी व्यवस्था, रचना, सुसङ्गति
किती तयांच्या लघुतेस शोभवी !

विकासकार्यीं नर-योनि राहिली
समग्रयोनींमधिं अुत्तमा, फुका !
बने कनिष्ठाहुनिही कनिष्ठ ती
भयाण संहारयुगांत हिंसका !

परस्परांना गिळतां दिसून ये
न मत्स्यसंघीं जितुकी भयाणता,
मनुष्यसंघीं तितुकी प्रतीत हो
स्वबन्धुघातीं अतिघोर हिंस्रता !

विनिर्मिताती जितुका महानल
खगोल अन्योन्यशरीरघर्षणीं—
तयाहुनी लक्षगुणें भयंकर
मनुष्य निर्मी निजलाभशोषणीं !

असङ्ख्य योनींतुनि हिण्डहिण्डतां
अपार पुण्यें धरि देह मानवी;
म्हणूनियां सन्तमहन्त वानिति
किती नराची अनुरूप थोरवी !

कुणी म्हणे होअुनि मच्छकच्छप
सजे नियन्ता हरि विश्वरक्षणिं;
तरीहि दावी निज भव्यता निकी
नरावतारें परिपूर्ण होअुनी ! ७१८

जीवनयोग

कुणी म्हणे हा प्रभुनेंच निर्मिला
निजस्वरूपावरुनीच अुज्ज्वल,
प्रतिक्षणीं जो स्मरवी स्मरोपम
जगत्प्रभूची स्फुरती प्रभावळ !

असा नटे जो परमात्मसद्‌गुणें
महाविचारी महनीय मानव;
तयेंच ना जागविला जगामधें
महाविकारी दमनीय दानव ! !

सबन्ध सृष्टींतिल सङ्गरामधें
विवेकयोगें स्थिर होय मानवी;
तया विकासा दिधल्या सुबुद्धिचा
विनाशकार्यीं विनियोग चालवी ! !

सुबुद्धिशाली मनुजें स्वबुद्धिनें
विकासिली ही अभिरूप संस्कृति !
विराट्‌स्वरूपी निजशास्त्र भौतिक
तयेंच नेलें परमोन्नतीप्रति ! ·८१४

निसर्गशक्ती जरि चालवी सदा
तयावरी राज्य अनेकरीतिंनीं,
तरी नरें सृष्टिबलास लाविलें
मतिप्रभावें अुपयोगकारणीं !

समुन्नती साधुन भौतिकी, अहा !
चिदुन्नती साधिल काय जीवनीं,
स्वतन्त्र नी सुस्थिर बुद्धिजीवि हा
नरानरांतील समत्व लक्षुनी ?

विवेकमार्गें व्यवहार जाणुनी
परस्परांशीं सहकार साधितां
अपूर्वशी संस्कृति या जगामधें
नरप्रयत्नें स्थिर होय निश्चिता !

वसुन्धरापृष्ठिं विशाल वाढला
कबीरवृक्षापरि वंशवृक्ष जो
हळूहळूं हो विकलाङ्ग दुभंग—
युगायुगाच्या परिवर्तनांत तो !

फिरून फान्द्या लववील लाम्बशा ?
पुन्हां मुळ्या हा अनिरुद्ध लोम्बवी ?
अरे ! ! विकारी वणव्यांत पोळला
फुटेल का त्यास वसन्तपालवी ? ? ८३४

जिच्यामुळें साधित भौतिकोन्नति,
जियेमुळें जिङ्कित तो परिस्थिति,
तया निसर्गीय महान शक्तिनें
स्व ‘बुद्धिनें’ शोधित ‘युद्धसाधनें’ !

न जीवनींचे अनुबन्ध लक्षिले,
न पाहिलें विश्व समग्र दृष्टिनें;
निरुन्द सङ्कोच करून, आपुलें
विकासिलें जीवन ओकबाजुनें !

दुजें परी अङ्ग विकासहीन तें
जगांत संहारक होय भीषण;
सुरम्य सञ्जीवनरत्न दावुनी
जहाल हालाहल डंखि नागिण !

जिच्या प्रभेनें दिपती विलोचन,
स्फुरे अशी मोहकशी तडिद्द्युति;
न विस्मयांतून विमुक्त हो मन
असह्य तों भीषण घाव घालि ती !

सुधारसानें रसलें महाफल
मनुष्यमात्रास मिळेल भक्षणा,
म्हणून संगोपुन वृक्ष रक्षिला
तयें धरावें विषवृक्षरूप ना !

महानुभावी सुविवेकि धीरधी
जगास दावी शुभ राष्ट्रकल्पना,
दुरन्त आक्रान्त जगांत माण्डि ती
प्रमत्त मायाविनि साच पूतना !

स्वतन्त्रता अन् समता नि बन्धुता
जगीं अुभारी नव लोकसंस्कृतिः
नसे तियेचा अजि मागमूसही,
न जानकी !—रावण मात्र मातती ! ८६२

समग्र मानव्य धरून चिन्तनीं,
चराचरीं देखुन अेकरूपता,
न जोंवरी आन्तरराष्ट्र-जीवनीं
सहिष्णुता, तोंवरि कैंवि शान्तता ?

अखण्ड विश्वांत अशान्ति नाचते,
जणूं नटे हे प्रलयार्थ भैरवी !
प्रकोपवी सर्व चराचरांतलें
विकीर्ण संहारक तत्त्व ताण्डवीं !

भयाण संहारलयीस साधुनी
विनाशरङ्गीं भवकालि रङ्गली;
परन्तु ती होअिल शान्त शेवटीं
मुलांचिया प्रेमरसेंच माअुली !

अुफाळल्या विश्वसमुद्रमन्थनीं
फिरे सुमेरू स्थिर कच्छपावर;
परन्तु हालाहल फुंकि वासुकी
पिअील तें कोण विरक्त शङ्कर ?

समग्र अङ्गीं निज जीवनांतल्या
अुपायसंयोजन ना जरी करी,
न साधणें त्या नवनिर्मिती कधीं
समाजजीवीं नरजातिला तरी !

जगांत नान्देल समृद्धिशान्तता
न शान्तिचा केवळ मन्त्र गाअुनी;
न साधितां जीवनिंच्या समन्वया
कशी वसावी समतोलता जनीं ?

जधीं ‘अनासक्त’ असङ्ख्य शङ्कर
सुसिद्ध कण्ठीं विषदाह साहण्या—
तधींच हा जीवनयोग शक्य हो
करावया ध्येयसमान साधना !

*   *

अहा ! सखे ! अम्बरचुम्बरान्तरीं
अकल्प्य होतां तव भावदर्शन,
अगाधशा जीवनसागरीं अुठे
अुचम्बळोनी भरती विलक्षण !

जीवनयोग

अमूल्य सेवा तव बान्धवार्थ ती,
अभङ्ग ती ध्येयज भक्तिभावना;
तुझ्या कृतीची रचनात्म शक्ति ती
पुरी करी जीवनयोग कामना

तुझी महोदार अभङ्ग ती धृति,
तुझी मनींची, सखि, भक्ति कोवळी;
स्मरूनियां सन्तत पूजितों अतां
प्रतीकशी जीर्ण गुलाबपांकळी !

अनन्त हा जीवनपन्थ चालतां
अनेक होतीं परिवर्तनें नवीं,
जिथें जगत् हें क्षण दृष्टनष्टसें
कुठें तिथें मानवजीव थोरवी !

परी असें जीवन चेतनामय
सदैव कार्या स्फुरवील मानवा;
महान आदर्श कृतींत आणितां
मनास अुत्साह चढे नवानवा;

व्यतीत होतीं वरुषें हळुहळूं;
अतीत तूं जीवनिची सवंगडी !
गतींत माझ्या करि वाढ जी अशी
स्मृतींत मूर्ती तव सारखी खडी ! ! ११५

परिशिष्ट १ लें

[छंदोरचनाविषयक]

(१) **संदेश**: यांतील जाति **वंशमणि** असून तिचा उपयोग स्वर्गवासी कवि माधव ज्यूलियन यांनीं 'उमर खय्याम'च्या 'रुबायां'चें भाषांतर करतांना केला आहे. **भूपति** जातींतील पहिल्या दोन मात्रा कमी केल्यास **वंशमणि** जाति होते. (यमकरचना : अ अ ब अ)

(२) **मंत्रणा**: हा भाग **वैनायक** वृत्त म्हणून प्रसिद्धि पावलेल्या निर्यमक धांवत्या 'धवलचंद्रिका' जातींत आहे. '**महाराष्ट्र भाट**' सावरकरांनीं तिचा उपयोग विविध प्रकारांनीं केला आहे. प्रस्तुत लेखकाच्या 'वैनायकवृत्तविचार' (महाराष्ट्र साहित्यपत्रिका : एप्रिल, १९३८) या लेखांत त्याचें सांगोपांग विवेचन आलें आहे. मीहि मिल्टनच्या 'नष्टनंदन'च्या (पु० ४) निर्यमक भाषांतरासाठीं आणि '**विश्वमानव**' (अप्रसिद्ध) मधील खंडकाव्यांसाठीं याचाच उपयोग केला आहे.

(३) **बंदिवास**: कालिदासाच्या प्रसिद्ध **मंदाक्रांता** वृत्तांत हा भाग रचला गेला आहे. विवेचन, वर्णनौघ व विशेषतः संवाद यांचा उठाव या वृत्तामुळें फारच चांगला साधतो, म्हणून याची योजना करावीशी वाटली.

(४) **दर्शन**: (अ) याची समजाति **जगदीश्वरबाला** आहे. नेहमींच्या माहितींतील 'अक्रूर' जातींतील दिडका (विषम) चरण काढून टाकल्यानें ती साधते. करुणरसाच्या परिपोषाला ही जाति किती अनुकूल आहे तें रसिकांना माहीतच आहे. (अ ब क ब)

(ब) याचें वृत्त **वियोगिनी** असलें तरी तें फक्त वियोगासाठींच योग्य आहे असें नव्हे. यांतील आंदोलनें कुठल्याहि उत्कट भावनेचा यथार्थ आविष्कार करतील अशींच आहेत. (अ ब क ब)

(५) **जीवनयोग :** कालिदासादि महाकवींचें आवडतें **वंशस्थ** वृत्त यांत वापरलें आहे. 'कुमार-संभवा'च्या ५ व्या सर्गांत तर कालिदासानें या वृत्तामुळें कळसच चढविला आहे. येथेंहि गंभीर वातावरण, उत्कट भावना आणि तदनुरूप चिंतन यासाठीं तेंच सर्वतोपरी योग्य वाटलें.

परिशिष्ट २ रें

[आवश्यक वाटणाऱ्या कांहीं टीपा]

मथळाः—"जीवनयोग" हें नांव कै. गुरुवर्य ग. ना. टिपणीस अर्थात् कवि "भालचंद्र" यांच्या एका कादंबरीलाहि दिलेलें आहे. पण त्यांतील व प्रस्तुत काव्यांतील विचार व वातावरण अगदीं भिन्न आहे. म्हणून नामसादृश्यामुळें कुणीहि गैरसमज करून घेण्याचें कारण नाहीं.

संदेश :

पृ० ३ :—'हां ! ही कोरच' इ० यापुढील कथा प्रसिद्ध पौराणिक कथा आहे. संदर्भानुरोधानें किंचित् फेरफार केला आहे. पुढें आलेली ओळ 'चांद्रमसी ही सुधा' इ० कालिदासाच्या 'सुरद्विषश्चान्द्रमसी सुधेव' या ओळीवरून सूचित आहे.

परिशिष्ट

पृ० ५ :—‘ चुन्याखडीचा पायीं ताजमहाल ’— ज्याप्रमाणें ताजमहालाच्या हृदयहारी शिल्पाच्या पायाला दगड-चुन्यासारखे कठोर पदार्थच आहेत, त्याप्रमाणें या गुलाबाच्या पांकळ्यांखालीं कठोर कंटक आहे, यांत दुःखकारक असें कांहींच नाहीं; उलट तें सौंदर्य-वर्धकच आहे.

पृ० ५ :—‘ कथितों तुजला आतां एक कहाणी ’ —ही गुलाबाची कहाणी कल्पित आहे. फारसी परिस्तानांतील कथांप्रमाणें रम्याद्‌भुत वातावरणासाठीं ही योजना असली तरी त्यामुळें मूळ जीवनयोगाची त्यागसौंदर्याची कल्पनाहि सुचविली आहे. सबंध काव्यांत त्याचा स्नेह आणि सौंदर्य याचें प्रतीक म्हणून उपयोग केला आहे.

पृ० ८ :—‘ तुटती उल्का ’ इ० ही घटना काव्यमय प्रतीक आहे. याचाच उल्लेख पुढील ‘ मंत्रणा ’ विभागांत आला आहे. पुढील त्यागमय जीवनासाठीं नायिकेला ही सूचनाच मिळाली आहे.

मंत्रणा :

पृ० १२ :—‘ म्हणुनी नच काव्यमयी ’ इ० प्रथम काव्यमय उपपत्ति “अपन्हुती”नें सूचित करून ती न सांगण्याचें कारण मागाहून दुसऱ्या “दृष्टांता”नें स्पष्ट केलें आहे. तिची चमकून वळलेली नजरच जणुं आकाशांत प्रतिबिंबित झाली होती अशी ती “सुंदर” उपपत्ति, पण ती न सांगण्याचें कारण असें कीं, ज्याप्रमाणें व्यजनाकारा (छत्रीच्या आकाराच्या) उषेचें दर्शन घेण्यासाठीं जरी नावाडी हपापला तरी बर्फांतच त्याची होडी अडकल्यामुळें तें सौंदर्यदर्शन त्याला रुचलें नाहीं !

पृ० १७ :—‘ कीं अरुंधती ’ इ० सप्तर्षि मंडलांतील ताऱ्यांतील अरुंधती अंधुक दिसते व ती उत्तरध्रुवाजवळ उषेच्या सन्निधच असते,

या वस्तुस्थितीवर ही उपमा आधारली आहे. या भागांतील शेवटाचें हें प्रतीक जीवनयोगांतील सेवाभावाचें सूचक आहे.

बंदिवास :

पृ० २१ :—"कोलूदांडा कुरकुर करी...अन् रची काव्य थोर" हा उल्लेख स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या अंदमानांत रचलेल्या "कमला"दि सुंदर काव्यांस उद्देशून आहे.

पृ० २३ :—'जो विज्ञानें गतिमय' इ० भौतिक शास्त्रज्ञांनीं अमर्याद यांत्रिक गतीचा अेक बाण (rocket) मंगळावर सोडल्याचें प्रसिद्धच आहे. पण तो परत आला असला पाहिजे. त्याला उद्देशून हें श्लेषात्मक रूपक आहे. विज्ञान (शास्त्र आणि आत्मज्ञान) यांनीं युक्त असा निश्चययुक्त आदर्शाचा स्वीकार केला असूनसुद्धां तो बाण व मनुष्य अजाणतां परत मूळ मर्यादित अवस्थेंत येतो. "वैकुंठासी गमन" इ० तुकारामाला वैकुंठाला नेण्यासाठीं अंगणांत विमान आलें. तो जिजेला म्हणतो, 'चल!' पण जिजेला दळणकांडणच अधिक आवडतें! मनोवृत्तींचा असाच द्विविध व्यापार चालत असतो.

पृ० २७ :—'करिं दे तें गुलाबी प्रतीक' कैदेंत जातांना तिच्यापाशीं जतन करावयास दिलेला हा गुलाब; त्याला पुढील निराशेच्या काळांतहि चैतन्य देणारें हेंच तें स्मृति-प्रतीक.

दर्शन :

पृ० ३२ :—'परि मीच विमूढ' इ० यांतील 'जरान्विता' शब्द 'आ' प्रत्ययान्त द्वितीयेचा आहे.

पृ० ३३ :—'गगनीं तिलोत्तमा'—राजा रविवर्म्यानें अप्सरा तिलो-त्तमेचें जें सुंदर चित्र काढलें आहे त्याला अनुलक्षून हा उल्लेख आहे.

जीवनयोग :

"जीवनयोग" हा ५ वा खंड आणि मागील खंड यांमध्यें कांहीं वर्षांचें अंतर आहे. या खंडांत नायकाची सध्यांची मनोभूमिका विशद झाली आहे. आणि शेवटीं चालू वर्तमानाचा भूतकाळांतील घटनेशीं संबंध दर्शविला आहे.

नायकाचीं आजचीं मानसिक परिवर्तनें यांत सूचित आहेत. त्याच्यापुढें सुकलेल्या गुलाब-पाकळ्या आहेत, आणि मनांत पत्नीची स्मृति आहे. अर्थात् काळ 'दर्शना'नंतर कांहीं वर्षांचा आहे.

पृ० ३८ :—'कुणी म्हणे हा प्रभुनेंच निर्मिला' येसूच्या धर्मांतील ही कल्पना आहे.

पृ० ३९ :—'वसुंधरापृष्ठिं विशाल वाढला' इ० पूर्व गुजरातमध्यें अतिशय प्रसिद्ध कबीर-वड आहे. त्याच्यासंबंधींचें रसमय वर्णन श्री. काकासाहेब कालेलकरांच्या "तीन वड" या ('लोकशिक्षणां'त अनुवादलेल्या) लेखांत आलेंच आहे.

पृ० ४० :—'महानुभावी सुविवेकि' इ० मॅझिनी, रूसो, व्होल्टेअर वगैरेंनीं जी लोकसत्तेची राष्ट्रकल्पना प्रसृत केली तिची विकृति "National Socialism" (म्हणजेच नात्सीवादांत) झाली आहे.

मराठी वाङ्मयांतील अमूल्य व अभिनव ग्रंथ

पुरोगामी साहित्य

लेखक : आचार्य शं. द. जावडेकर

महाराष्ट्र वाङ्मयांत आचार्य जावडेकर यांचा अधिकार अनन्य-साधारण आहे. प्रस्तुत ग्रंथांत आचार्यांचें मुंबई-उपनगर साहित्य-संमेलनांतील अध्यक्षीय भाषण, त्या भाषणावरील प्रो. ना. सी. फडके यांची सात्त्विक टीका व त्या टीकेचें आचार्यांनीं केलेलें तात्त्विक खंडन यांचा साकल्यानें समावेश करण्यांत आला असून शेवटीं उभयतांचीं पत्रेंहि जोडण्यांत आलेलीं आहेत.

'पुरोगामी साहित्य' या विषयावर आतांपर्यंत अनेक वादविवाद झाले असले, तरी त्याचा सर्वांगीण दृष्टीनें विचार करून शास्त्रशुद्ध विवेचन करणारा ग्रंथ मराठी वाङ्मयांत अद्यापि उपलब्ध नव्हता. आचार्य जावडेकरांनीं ही उणीव उत्कृष्ट रीतीनें भरून काढिली आहे असा अभिप्राय सर्व तज्ज्ञांनीं एकमुखानें दिला आहे. प्रमुख वृत्तपत्रांनींहि या ग्रंथाची मुक्तकंठानें प्रशंसा केली आहे.

मराठी वाङ्मयाच्या अभ्यासकांनाहि हा ग्रंथ अचूक मार्गदर्शन करील. आजच मागणी करून आपल्या संग्रहीं ठेवा.

पृष्ठसंख्या १५४ : मूल्य १॥ रुपया

व्यवस्थापक

सन्ध्या-प्रकाशन

१२ टिळक रोड, पुणें २